रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १६५
www.ramprahar.com

मंगळवार, ३१ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

'शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार'/२

समृद्ध करणारी अटल करंडकची आनंददायी प्राथमिक फेरी/४

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी रायगडच्या संघाची निवड/८

## एआयचा वापर करून रस्ते सुरक्षेवर दिला जाणार भर

**मुंबई :** राज्याच्या मुख्यमंत्रिपदी पदभार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकांचा



धडाका लावला आहे. मंत्रिमंडळ विस्तारानंतर खातेवाटप होताच संबंधित खात्याच्या मंत्र्यांसमवेत मुख्यमंत्री फडणवीस बैठक घेऊन आढावा घेत आहेत. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमवेत त्यांनी परिवहन विभागाचा आढावा घेतला. राज्याला सुरक्षित, सुंदर आणि शाश्वत ठेवण्यासाठी पुढील तीन वर्षात नवीन ई.व्ही. पॉलिसी घोषित करण्याकरण्याबरोबरच १५ वर्ष झालेली वाहने भंगारात काढावी. रस्ते अपघाताचे प्रमाण करण्यासाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून रस्ते सुरक्षा वाढविण्यावर भर देण्यात यावा. या संदर्भात गुगलशी करार झाला असल्याने त्याचा वापर करावा. त्याचबरोबर घाटात मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याने यावर इंजिनियरिंग सोल्यूशन शोधून काढावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिल्या.

# भाजप संघटन पर्व सदस्यता अभियान

## महाराष्ट्र प्रभारी आमदार रवींद्र चव्हाण यांच्याकडून आढावा

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप संघटन पर्वाचे महाराष्ट्र प्रभारी आमदार रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि. ३०) पक्षाच्या मुंबई येथील प्रदेश कार्यालयात बैठक घेत सदस्यता अभियानाचा आढावा घेतला. सदस्य नोंदणीच्या माध्यमातून दीड कोटी लोकांना पक्षासोबत जोडण्याचे उद्दिष्ट आहे.



भाजपचा अधिकाधिक विस्तार करण्याच्या दृष्टिकोनातून पक्षाकडून नव्या अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. पक्षाची मूळ संघटना आणि इतर मोर्चा व सेलकडे सदस्य नोंदणीची जबाबदारी देण्यात आले असून महिला मोर्चा, युवा मोर्चा, ओबीसी मोर्चा या मुख्य मोर्चांसह इतर सेल व आघाड्यांना सदस्य नोंदणीच्या माध्यमातून अधिकाधिक लोकांना भाजपशी जोडण्याचे लक्ष देण्यात आले. १ ते १५ जानेवारी या दरम्यान होणाऱ्या संघटन पर्व या अभियानाच्या माध्यमातून दीड कोटी लोकांना भाजपसोबत जोडण्याचे टार्गेट ठेवण्यात आले आहे. या दृष्टीने भाजपचे नेते आमदार रवींद्र चव्हाण यांच्यावर संघटन पर्वाचे महाराष्ट्र प्रभारी म्हणून जबाबदारी देण्यात आली असून त्यांनी या दृष्टीने कामाला सुरुवात केली आहे.

या वेळी आमदार रवींद्र चव्हाण म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत सर्वांना बनवायचा आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रसुद्धा त्याच दिशेने नेण्याचा दृष्टिकोन आहे. आपला सर्वांचा खारीचा वाटा त्यात असला पाहिजे. भाजपमध्ये राष्ट्रसेवेसाठी तरुण मित्रांचे मी स्वागत करतो. ज्या ज्या समस्या असतील त्या सर्व प्रतिनिधी म्हणून सोडवण्यासाठी आम्ही कट्टीबद्ध राहू, असेही त्यांनी म्हटले.

दरम्यान, महिला मोर्चा आणि युवा मोर्चाला राज्यभरात सदस्य नोंदणीचे लक्ष्य देण्यात आले आहे, तर इतर आघाड्यांना व पक्षातील सेलनाही सदस्य नोंदणीची जबाबदारी देण्यात आली आहे.

### ध्येयपूर्तीसाठी एकत्र काम करणार

*आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आमदार रवींद्र चव्हाण यांनी या वेळी भाष्य केले. मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली कामाला सुरुवात झाली आहे. एक चांगले वातावरण संपूर्ण महाराष्ट्रात पहायला मिळत आहे. प्राथमिक सदस्य नोंदणीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. ध्येय पूर्ण करण्यासाठी सगळे एकत्र काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.*






**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या संकल्पनेतून न्हावेखाडी येथे साकारलेल्या सर्वांगसुंदर रामबाग उद्यानाला उद्योजक राजू गुप्ते यांनी रविवारी भेट दिली. त्यांचे तसेच काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वागत व सन्मान केला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, रामबाग व्यवस्थापन कमिटीचे अध्यक्ष सागर ठाकूर, श्री म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर आदी उपस्थित होते.**

# 'थर्टीफर्स्ट'ची जोरदार तयारी

## पोलीसही झाले सज्ज; गैरकृत्यांवर राहणार 'वॉच'

**अलिबाग : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाचे स्वागत करण्यासाठी हौसी मंडळींनी जोरदार तयारी केली आहे. रायगड जिल्ह्यात पर्यटकही मोठ्या संख्येने सेलिब्रेशनसाठी आले आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सज्ज झाली असून अवैध धंद्यांवर, गैरकृत्य करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर असणार आहे.



रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील हॉटेल, धाबे, कॉटेजेस्, फार्महाऊस येथे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. दारू पिऊन धिंगाणा घालणे, नशेत वाहन चालविणे, अमली पदार्थांचे सेवन करणे, गैरवर्तन करणे यावर प्रतिबंधासाठी पोलीस पथके तयार करण्यात आली आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी समुद्र किनाऱ्यांवर, शहर, तालुक्यातील मुख्य बाजारपेठेत साध्या गणवेशातील पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचे पथक नेमण्यात आले आहे. समाजमाध्यमांवर कोणीही व्हिडीओ, फोटो, ऑडीओ क्लिपद्वारे आक्षेपार्ह पोस्ट करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे.

रायगड जिल्ह्यात येणारी सर्व वाहने, फार्महाऊसेस, हॉटेल्स, लॉजेस्, पार्ट्यांची ठिकाणे, समुद्र किनारपट्टी येथे पोलीस ठाण्याकडील साध्या वेशातील पथके व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांमार्फत करडी नजर ठेवण्यात येणार आहे. वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये याकरीता मुख्य रस्ते तथा वाहतूक कोंडी होणारे ठिकाणे येथे वाहतूक पोलीस अंमलदार नियुक्त करण्यात आलेले आहेत. अलिबाग रिलायन्स बायपास, पोयनाड ते पेझारी नाका, माणगाव मुख्य बाजारपेठ येथे वाहतूक नियोजनासाठी ड्रोन कॅमेराद्वारे नजर ठेवून वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याकरिता वापर करण्यात येणार आहे. १०९ पोलीस अधिकारी, ८७४ अंमलदार, ९२ वाहतूक, दोन आरसीपी प्लाटून, १०० होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत.

मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाईसाठी ९२ वाहतूक अंमलदारांची नेमणूक करण्यात आली असून १३ ब्रेथ अनालायझरव्दारे तपासणी करण्यात येणार आहे. ३८ नाकाबंदी पॉइंट, ११७ फिक्स पॉइंट, ११२ पेट्रोलिंग सेक्टर असा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

नववर्षाच्या स्वागतासाठी नवी मुंबई पोलिसांनीही ठिकठिकाणी सुरक्षेत वाढ केली आहे. सरत्या वर्षाला निरोप देताना मोठ्या प्रमाणात रस्त्यावर मद्यपी आणि चरशींवर योग्य ती कारवाई करण्यासाठी पोलीस यंत्रणा ॲक्शन मोडमध्ये तयारीत आहे. नववर्षाची पार्टी करताना अनेक तरुण-तरुणी ड्रग्जचे सेवन करतात. याबाबत नवी मुंबई पोलिसांनी सुरक्षेत वाढ केली आहे. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक चौकाचौकात पोलिसांचा गस्त राहणार आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर गुन्हे दाखल होणार आहेत, असे पोलीस आयुक्त भारंबे यांनी सांगितले.

### मद्यपी चालकांनो सावधान!

अनेक जण थर्टीफर्स्टच्या पार्टीनंतर मद्यपान करून वाहन चालवतात. अशा वेळी ते स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालत असतात. मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांवर चाप बसावा याकरिता ब्रेथ अनालायझरचा वापर केला जाणार असून मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

## निवडक

### घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटना; अरशद खानला अटक

**मुंबई :** घाटकोपरमधील पेट्रोल पंपावर महाकाय फलक कोसळून १७ जणांचा मृत्यू झाल्याप्रकरणी गुन्हे शाखेने व्यावसायिक अरशद खान याला लखनऊ येथून अटक केली आहे. ईगो मीडियाने विविध व्यवहारांमध्ये बँक खात्यांत पाठवलेली रक्कम अरशद खानला मिळाल्याचा आरोप आहे. त्या प्रकरणी गुन्हे शाखेने अरशद खानला समन्स बजावले होते, पण त्याने न्यायालयात धाव घेतली. त्यानंतर तो बेपत्ता झाला होता.

### स्कॉटलंडमध्ये नदीकाठी सापडला भारतीय विद्यार्थिनीचा मृतदेह

**एडिनबर्ग :** स्कॉटलंडची राजधानी एडिनबर्ग येथील हेरियट वाट यूनिव्हर्सिटीमध्ये शिक्षण घेणारी २२ वर्षीय भारतीय विद्यार्थिनी सांतरा साजू ही डिसेंबरच्या सुरुवातीला बेपत्ता होती. तिचा मृतदेह शहराजवळ असलेल्या नदीकाठावर आढळून आला आहे. ती मूळची केरळची होती. ओळख पटवण्यासाठी तिच्या कुटुंबियांना बोलवून घेण्यात आले.

# कोर्लई अत्याचारप्रकरणी आरोपीला अटक

## विशेष ग्रामसभेत घटनेचा निषेध; कठोर शिक्षेसाठी पोलिसांना निवेदन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथील अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचारप्रकरणी रेवदंडा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. दरम्यान, घडलेल्या घटनेचा कोर्लई येथे बोलविण्यात आलेल्या विशेष ग्रामसभेत निषेध करण्यात आला व आरोपीला कठोर शिक्षा व्हावी यासाठी पोलिसांना निवेदन देण्यात आले.



या संदर्भात माजी जि.प.सदस्य मानसी दळवी यांनीही रेवदंडा पोलीस ठाणे येथे भेट देऊन गुन्ह्यासंदर्भात माहिती घेतली व सखोल चौकशीसह आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

२२ वर्षीय आर्यन दीपक कोटकर या नराधमाने कोर्लई समुद्र किनारी २७ डिसेंबर रोजी दुपारी अडीचच्या सुमारास प्रातः विधीसाठी लहान भाऊ व बहिण यांच्यासह आलेल्या सात वर्षीय मुलीला मच्छीमार बोटीत नेऊन लैंगिक अत्याचार केला होता. याबाबत पीडित मुलीच्या आईने रेवदंडा पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार आरोपीविरोधात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

दरम्यान, घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोर्लई ग्रामपंचायत कार्यालयात रविवारी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामसभेस सरपंच राजश्री मिसाळ, भगीरथ पाटील, प्रशांत भोय यांच्यासह सर्वपक्षीय नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी निषेध ठराव करण्यात आला. सर्वानुमते तो मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे या घटनेतील आरोपीला जास्तीत जास्त व कठोर शिक्षा व्हावी यासाठी रेवदंडा पोलीस ठाण्यात निवेदन देण्याचा ठराव घेण्यात आला. त्यानुसार सोमवारी (दि. ३०) सरपंच मिसाळ, भगीरथ पाटील, प्रशांत भोय, अनंत पाटील, जितेंद्र पाटील, उपेंद्र बलकवडे, अभय पाटील, गजानन पाटील, रियाज चौगले, पठाण, पोलीस पाटील व ग्रामस्थ यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरविले यांची भेट घेऊन निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की, घडलेल्या घटनेने कोर्लई परिसरात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच संपूर्ण गाव व गावातील लोक असुरक्षित झाले आहेत. या गुन्ह्यातील आरोपीवर यापूर्वी महिलांची छेडछाड, चोरी, मारामारी, व अन्य गुन्हे दाखल आहेत. **(पान २ वर..)**

# आणखी एका क्रिकेटपटूचा भर मैदानात दुर्दैवी मृत्यू

**जालना : प्रतिनिधी**

क्रिकेट खेळताना, व्यायाम करत असताना तरुणांमध्ये हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. जालन्यातही असाच एक धक्कादायक प्रकार घडला असून क्रिकेट स्पर्धेदरम्यान एका ३२ वर्षीय फलंदाजाचा मैदानात क्रिझवरच हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.



मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील फ्रेजर बॉईजच्या मैदानावर ख्रिसमस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विजय पटेल फलंदाजी करत होता. त्याने षटकार मारल्यानंतर मधल्या वेळात तो सहकारी फलदांज अजय कसबेशी बातचीत करत होता. तेवढ्यात तो जमिनीवर कोसळला. या वेळी त्याला पाहण्यासाठी इतर खेळाडूंनी धाव घेतल्याचे दिसून येते. त्याला रुग्णालयात दाखल केले असता त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

# राज्यात थंडीचे पुनरागमन होणार

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील हवामानात पुन्हा एकदा बदल होणार आहेत. गेल्या आठवड्यात डोकावलेला अवकाळी पाऊस आता जवळजवळ परतला असून थंडी पुन्हा परत येणार आहे, असा अंदाज भारतीय हवामान खात्याने वर्तवला आहे.



राज्यात गेल्या काही दिवसांपासून कमाल तापमानसह किमान तापमानात वाढ झाली होती. कमाल तापमान ३० अंश सेल्सिअस, तर किमान तापमानदेखील २० अंश सेल्सिअसवर पोहचले होते. येत्या २४ तासात कमाल व किमान तापमानात मोठे बदल होण्याची शक्यता भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात किमान तापमानात दोन ते चार अंश सेल्सियसने तापमान घसरणार आहे. विदर्भातदेखील चार ते पाच अंश सेल्सिअसने तापमानात घट होणार आहे. नवीन वर्षाची सुरुवात गुलाबी थंडीने होणार असून राज्यात हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे.

कोरड्या वाऱ्यांचा झोत राज्यात वाढणार असून तुरळक भागात हलका पाऊसही असण्याची शक्यता आहे. किमान व कमाल तापमान पुन्हा एकदा घट होण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात राज्यात ढगाळ वातावरण आणि अवकाळी पावसाला पोषक स्थिती होती. दरम्यान, अरबी समुद्रात वाढलेल्या आर्द्रतेमुळे राज्यात अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. आता चक्राकार वाऱ्यांची स्थिती सध्या उत्तर प्रदेश आणि परिसरात आहे. उत्तरेकडील राज्यात दाट धुके आणि थंडीची लाट आहे. परिणामी राज्यात कोरड्या वाऱ्यांचे प्रवाह सक्रिय होणार आहेत.

राज्यात किमान तापमानात वाढ झाली असून याआधी चार ते पाच अंशांवर असणारा किमान तापमानाचा पारा १९ ते २० अंशांपर्यंत गेल्याच्या नोंदी झाल्या. मुंबईत किमान तापमान २० अंशांच्याही पुढे गेले होते, तर सांगली, सातारा तसेच बहुतांश मध्य महाराष्ट्रात किमान तापमानाचा पारा १७ ते २० अंशांवर जाऊन ठेपला होता. महाराष्ट्रासह नव्या वर्षाची सुरुवात गुलाबी थंडीने होणार असून हवामान खात्याच्या अंदाजानुसार हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब हरियाणा भागात थंडीची लाट राहणार असून राज्यात हवामान कोरडे राहणार आहे.

## राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा

# २५ एकांकिका अंतिम फेरीत दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेची प्राथमिक फेरी पूर्ण झाली आहे. राज्यातील वेगवेगळ्या केंद्रांवर सादर झालेल्या एकांकिकांमधून एकूण २५ एकांकिका अंतिम फेरीसाठी पात्र ठरल्या आहेत.

नाट्यचळवळ वृद्धींगत करण्यासाठी व नाट्यरसिकांना आपले नाट्याविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे तसेच देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वृद्धींगत व्हावा याकरिता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी रंगमंच आमचा कलाविष्कार तुमचा हे ब्रीदवाक्य घेऊन अटल करंडक एकांकिका या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. यंदा या स्पर्धेचे अकरावे वर्ष आहे. प्राथमिक फेरीचे परीक्षक म्हणून आशीर्वाद मराठे व मानसी दोशी-मराठे यांनी काम पाहिले.

या स्पर्धेची अंतिम फेरी १० ते १२ जानेवारीदरम्यान पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार आहे. अंतिम फेरीतील विजेत्या प्रथम क्रमांकाच्या एकांकिकेस एक लाख रुपये, प्रमाणपत्र आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय ७५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ दोन बक्षिसे प्रत्येकी १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह तसेच इतरही वैयक्तिक पारितोषिके देऊन कलाकारांना गौरविण्यात येणार आहे.


### अंतिम फेरीत दाखल एकांकिका

बॉईल्ड-शुद्ध शाकाहारी (कलादर्शन व नाट्यशृंगार, पुणे), सखा (एमईएस आयएमसीसी कॉलेज, पुणे), हनिमून (एस. एम. प्रॉडक्शन, पुणे), देव-बाप्पा? (कलाकार मंडळी, पुणे), अलमोस्ट डेड (रंगप्रसंग, कोल्हापूर), कलम ३७५ (परिवर्तन, कोल्हापूर), पिंडग्राम (डी.वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर), व्हाय नॉट (आर.आय.टी., इस्लामपूर), गोधा आणि कमुचा फार्स (रंगशाळा, जळगाव), वेदना सातारकर हजर सर (सी. के. ठाकूर स्वायत्त महाविद्यालय, पनवेल), वर्तुळ (रंगवेध थिएटरर्स, पनवेल), कुक्कुर (सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, ठाणे), Gene Gene झिंगाट (म.ल. डहाणूकर, मुंबई), चिनाब से रावी तक (क्राऊन नाट्यसंस्था आणि स्टोरीया प्रॉडक्शन, डोंबिवली), ब्रह्मपुरा (एम.डी. कॉलेज, परळ, मुंबई), जुगाड लक्ष्मी (गुरू नानाक खालसा कॉलेज, मुंबई), बॉडी ऑफ नरेवाडी (फितूर थिएटर सोसायटी, संत झेवियर कॉलेज, मुंबई), आविघ्नेया (सिडेनहॅम कॉलेज, मुंबई), गुड बाय किस (जिराफ थिएटरर्स, मुंबई), पाटी (एकदम कडक नाट्यसंस्था, मुंबई), जापसाल (उगवाई कलारंग, फोंडाघाट कणकवली), सर्पसत्र (एम्पिरिकल फाउंडेशन, कल्याण), न्युरालिंक (तोंडक मोडक नाट्यसंथा, ठाणे), क्रॅक्स इन द मिरर (कलांश थिएटरर्स, मुंबई), पसायदान (कल्लाकार्स, नौपाडा ठाणे).

# शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार -कृषीमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

कृषी विभागातील केंद्र व राज्य शासनाच्या योजना प्रभावीपणे राबवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे कृषीमंत्री अॅड.माणिकराव कोकाटे यांनी राज्याचे कृषीमंत्री म्हणून पदभार घेताना मंत्रालयात सांगितले.





कृषी विभागात आवश्यक तिथे सुधारणा करून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले जाईल. केंद्र व राज्य शासनाच्या योजना राज्यात राबवताना अधिक समन्वय साधला जाईल. कृषी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात येईल. प्राधान्याने हाती घ्यावयाचे विषय, नवीन धोरणे यांचा अभ्यास करण्यात येईल. शेती आणि शेतकरी यांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास असल्याचेही कृषीमंत्री अॅड. कोकाटे म्हणाले.

यावेळी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मंगेश गोंदावले, उपसचिव हेमंत म्हापनकर, उपसचिव संतोष कराड, उपसचिव प्रतिभा पाटील, उपसचिव अंबादास चंदनशिवे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर उपस्थित होते.

दरम्यान, अॅड. माणिकराव कोकाटे यांनी कृषिखात्याचा पदभार हाती घेतल्यावर ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली या क्षेत्रात काय काय करता येईल आणि शेतकऱ्यांची प्रगती कशी साधता येऊ शकते या दृष्टीने काम करताना दिसत आहेत.

# माथेरानमधील क्रीडा संकुलाची दयनीय अवस्था



**माथेरान : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठे क्रीडा मैदान म्हणून माथेरानचे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल (ऑलिंपिया मैदान) प्रसिद्ध आहे.या मैदानाची दयनीय अवस्था झाली आहे. सुशोभीकरणासाठी पाच कोटी रुपये खर्च करूनदेखील मैदान सुस्थितीत नसल्याने क्रीडाप्रेमींमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

माथेरान पर्यटनस्थळी वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल मैदानावर जानेवारीपासून मार्च महिन्यापर्यंत टेनिस बॉल क्रिकेट सामने आयोजित करण्यात येतात तसेच मे महिन्यात तर अश्व शर्यतीचे आयोजन देखील दरवर्षी करण्यात येते. येथे क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. जवळपास पंचवीस एकारांमध्ये या मैदानाची व्याप्ती असून गावापासून दूरवर हे मैदान आहे.

## ठोस उपाययोजना करण्याची मागणी

या मैदानाच्या सुशोभीकरण आणि दुरुस्तीसाठी मागील काळात जवळजवळ पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती, मात्र याठिकाणी अयोग्य नियोजनामुळे या मैदानाच्या विकासकांमांचा पुरता बोजवारा उडाला आहे.प्रेक्षकांना बसण्यासाठी असलेल्या स्टेडियम मधील शेडचे पत्रे गायब झालेले असून उन्हाळ्यात प्रेक्षकांना झाडांचा आधार घ्यावा लागत आहे आणि दूरवरून क्रिकेट सामने पाहताना

जांभ्या दगडांचा अनाठायी वापर करून एकप्रकारे या मैदानाला बकालपणा आणलेला असल्याने हे मैदान पूर्णपणे विद्रुप झालेले दिसत आहे. निदान प्रेक्षकांना उन्हापासून बचाव करण्यासाठी या मैदानाच्या स्टेडियमवर पत्रे लावण्यात यावेत जेणेकरून कुणालाही उन्हांच्या झळांना सामोरे जावे लागणार नाही. प्रेक्षकांना क्रिकेट सामने पाहताना मनसोक्तपणे आनंद घेता येईल याकरिता ठोस उपाययोजनेची मागणी होत आहे.

# नवी मुंबईत २१८ मद्यपी चालकांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर वाहतूक पोलिसांनी मह पिऊन वाहने चालविणाऱ्यांविरोधात धडक मोहीम सुरू केली आहे याअंतर्गत २० ते २७ डिसेंबर या कालावधीत २१८ मद्यर्प वाहनचालकांवर ड्रंक अॅण्ड ड्राइव्ह अन्वये गुन्हे दाखल केले आहेत वाहतूक विभागाचे उपायुक्त तिरुपत काकडे यांच्या मार्गदर्शनाखाल पोलिस आयुक्तालयातील १६ वाहतूक शाखांच्या माध्यमातून एकाच वेळी ह कारवाई मोहीम राबविण्यात आली.

# चौक ग्रामपंचायतीत माझी वसुंधरा कामाला वेग

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अभियानात ग्रुप ग्रामपंचायत चौक सक्रिय झाली असून हे अभियान यशस्वी करण्यासाठी सरपंच,उपसरपंच, सदस्य, ग्राम पंचायत कर्मचारी व ग्राम पंचायत अधिकारी यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने सुरुवात केली आहे.



पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी माझी वसुंधरा (माय अर्थ) हा अभिनव उपक्रम पर्यावरण विभागाने हाती घेतला आहे. हा उपक्रम निसर्गाच्या पंचमहाभूते नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे. या उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करून त्यांना पर्यावरणाच्या सुधारणे प्रती प्रयत्न करता येत आहेत.

यातून राज्याच्या शाश्वत विकासा प्रति प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून ग्रूप ग्रामपंचायत चौक यांनी कंबर कसली आहे. ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी या स्पर्धेत भाग घेतला असून नोहेंबर व डिसेंबर या दोन महिन्यात या संदर्भात केलेल्या कामांचा आढावा घेतला. प्लास्टिक मुक्ती, स्वच्छता अभियान, ओला आणि सुका कचरा व्यवस्थापन आणि लावलेली झाडे जगली आणि जागविण्याचा झालेला प्रयत्न यावर लक्ष केंद्रित केले आहे. सद्या बाजार पेठ मध्य कचरा न करण्याची शपथ दिली व घेतली जात आहे.

**‘ग्रामस्थांच्या मदतीने अभियान यशस्वी करू’**

**माझी वसुंधरा हे अभियान असले तरी ग्रामस्थांच्या मदतीने यशस्वी करण्यासाठी आम्ही बांधील आहोत, असे सरपंच रितू ठोंबरे व ग्रामपंचायत अधिकारी एस.पी. जाधव म्हणाले.**

# ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणी शिबिराची सांगता

**रायगड : रामप्रहर वृत्त**

आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते व जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणी शिबिराचा सांगता कार्यक्रम झाला.

या वेळी आरोग्य विभागाचे संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, नर्सिंग विभागाचे उपसंचालक डॉ. पुरुषोत्तम मडवी यांनी सदिच्छा भेट दिली तसेच सेंट्रल टीबी डिव्हिजनल टीमने भेट दिली.

या शिबिरामध्ये जिल्ह्यातील १७४ ज्येष्ठ महिला तर २९० पुरुष असे एकूण ४६४ नागरिकांनी सहभागी होऊन आरोग्य तपासणी करून घेतली. ज्येष्ठ नागरिकांमध्ये आढळून येणारे उच्च रक्तदाब, मधुमेह, पक्षाघात तसेच हृदयरोग याबाबत ३०९ नागरिकांची तपासणी करण्यात आली. त्याचप्रमाणे २९७ रुग्णांच्या डोळ्यांची तपासणी करून डोळ्यांचे आजार व मोतिबिंदू चेकअप करण्यात आले.

शिबिरांतर्गत १८६ रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले असून ३७ रुग्णांवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिबिरातील ज्येष्ठ महिलांचे आजार, स्तन कर्करोग व गर्भाशयमुख कर्करोगबाबत तपासणी केली गेली. ८४ नागरिकांची नाक, कान, घसाबाबत तपासणी व शस्त्रक्रिया करून गरजेनुसार ३० श्रवणयंत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच १७८ रुग्णांना ऑर्थोपेडिक चेकअप, एक्स-रे, फिजिओथेरपि सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. दंत विभागांतर्गत ५१ नागरिकांची मुख आरोग्य तपासणी करून गरजू लाभार्थ्यांवर पुढील उपचार करण्यात येणार आहेत. सर्जरी विभागांतर्गत ३९ नागरिकांची हर्निया, हायड्रोसिल बाबत तपासणी करण्यात आली असून आवश्यकतेनुसार त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तर मानसिक विभागामध्ये ५७ नागरिकांची मानसिक आजार बाबत तपासणी करून उपचार देण्यात आले.

आयुष विभागांतर्गत ६३ नागरिकांची तपासणी पंचकर्म, आयुर्वेद उपचार देत समुपदेशन करण्यात आले. एकूण २७८ नागरिकाचे रक्त तपासणी करण्यात आली असून ४५ नागरिकांना आभाकार्ड व आयुष्मान भारत कार्डचे मोफत वितरण करण्यात आले. सदरच्या आरोग्य सेवा शिबिरापुरत्या मर्यादित न राहता जिल्हा रुग्णालयामार्फत यापुढे सुद्धा नियमिय देण्यात येणार आहेत.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अंबादास देवमाने यांनी तीन दिवसीय शिबीरास नागरिकांचा उदंड प्रतिसाद लाभल्याचे सांगितले. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शीतल जोशी-घुगे, डॉ.निशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिसेविका गायत्री म्हात्रे, सहा.अधिसेविका भोपी यांच्यासह सर्व विभागातील अधिकारी, अधिपरिचारिका, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी शिबीर यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# पुस्तक कसं शिकवायचं याची पुस्तकं यायला पाहिजेत -डॉ. दिलीप देशमुख



**माणगाव : बातमीदार**

पुस्तक कसं शिकवायचं याची पुस्तकं यायला पाहिजेत तसेच देशासाठी काम करा सर्व जग तुमच्या मागे येईल. असे वक्तव्य आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शक आणि डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अकॅडमी, पुणेचे संचालक डॉ. दिलीप देशमुख यांनी निजामपूर येथिल शैक्षणिक व करियर मार्गदर्शन मेळाव्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासामधे लक्ष केंद्रीत करुन राष्ट्रपुरुषांचा अभ्यास केला पाहिजे. मोठे होण्यासाठी खुप कष्ट करावे लागतात. यावेळी त्यांनी भारतरत्न सचिन तेंडुलकर यांचे उदाहरण समोर ठेवले ते म्हणाले कोणतीही मॅच असो सचिन नेहमी प्रॅक्टीस करुनच मैदानात उतरत होता. तसेच आपणही अभ्यास करुनच परिक्षा द्यायला पाहिजे. पालकांना ही आपल्या मुलांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारायला हवी याने मुलांची प्रगती होते. जगात कोणी हुशार नाही.लक्ष केंद्रित करण्यासाठी बुद्धिमत्ता विकसित करता येते तसेच संघर्ष व मेहनत यशामधे रुपांतर होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांच्या जिवनातील अनेक प्रसंग विद्यार्थ्यांसमोर ठेवले.

निजामपूर विभागातील शैक्षणिक क्षेत्राला नवसंजीवनी देण्याच्या दृष्टीने शिक्षणातून...संस्काराकडे...! संस्कारातून...स्वयंपूर्णतेकडे...!! या समृद्ध मार्गाने एक शैक्षणिक चळवळ उभी रहावी म्हणून श्री शिव समर्थ प्रतिष्ठान रायगड यांच्या वतीने पहिल्यांदाच निजामपूर शहरातील ग. रा. मेथा माध्यमिक विद्यालयात ईयत्ता ९ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण आणि करियर विषयी मार्गदर्शन व्हावे या हेतुने श्री शिव समर्थ प्रतिष्ठान,रायगड च्या संकल्पनेतून शैक्षणिक आणि करिअर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी नामांकित व्यक्तिमत्व श्रीनिवास बेंडखळे, निजामपूर विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष दत्तुशेठ पवार ,चेअरमन दत्ताजी नाडकर,संदिपशेठ मोदी,शरदभाई दोशी , राजन दोशी, सामाजिक कार्येकर्ते बाबुशेठ खानविलकर, श्री शिव समर्थ प्रतिष्ठाण चे अध्यक्ष संजोग मानकर, कार्याध्यक्ष संतोष रणपिसे, उपाध्यक्ष तुषार बगडे , सुधीर सापळे,सचिव रमेश ढेबे, सहसचिव अनिल चव्हाण ,खजिनदार डॉ. इरफान अंतुले उपस्थित होते. विभागातील शैक्षणिक संस्थेच्या ग रा मेथा माध्यमिक विद्यालय निजामपूर , न्यु ईंग्लीश स्कुल शिरवली, सुशिलाताई विद्यालय भाले , एस के भाटे विद्यालय बोरवाडी, हि म मेथा विद्यालय विळे , कुंडलिका विद्यालय पाटणुस,ना म जोशी विद्यालय गोरेगाव येथिल विद्यार्थी,पालक,शिक्षक,शिक्षणप्रेमी आणि सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

या शैक्षणिक मेळाव्यासाठी सरपंच राजाभाऊ रणपिसे ,बाबुशेठ खानविलकर , भाजप तालुका अध्यक्ष गोविंद कासार, उद्योजक मंगेशशेठ पोळेकर, युवासेना अध्यक्ष अविनाश नलावडे, मंगेश सावंत , संजय गुळंबे,चंद्रकांत जोरकर, नितिन बडे, उपेंद्र जाधव , सागर खानविलकर , राकेश सुतार यांनी विशेष सहकार्य केले तसेच या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन तुषार बगडेसर यांनी केले.

# महापारेषणच्या सहाय्यक अभियंता (पारेषण) पदाची परीक्षा सुरळीत

**मुंबई : प्रतिनिधी**

ऊर्जा विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने (महापारेषण) सहाय्यक अभियंता (पारेषण) या पदांसाठी घेतलेली ऑनलाईन लेखी परीक्षा सुरळीत व शांततेत पार पडली.

महापारेषणने ५५१ सहाय्यक अभियंता (पारेषण) या पदासांठी महाराष्ट्रातील ९३ केंद्रांवर ही परीक्षा घेतली. मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कराड यासह महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर ही परीक्षा दुपारी साडेचार ते सायंकाळी साडेसहा या वेळेत शांततेत पार पडली. यामध्ये २० हजार २९९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १५ हजार ८१८ उमेदवारांनी ही परीक्षा दिली. दरम्यान, दिव्यांग उमेदवारांसाठी नियमानुसार अतिरिक्त वेळ देण्यात आला होता. परीक्षा शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे व मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) यांनी परिश्रम घेतले.

पान १ वरुन

## कोर्लई अत्याचारप्रकरणी आरोपीला अटक



घटनेतील आरोपीसोबत गावातील फारूख नाजिम बेबल, वीरेंद्र रोहिदास चोरढेकर, यश घाडगे हे सातत्याने असतात व रात्रीच्या वेळी समुद्र किनारी चरस, गांजा आदी सेवन करून गावात फिरत असतात. या संदर्भात चौकशी व्हावी व अशांतता निर्माण करणाऱ्यांना गावातून तडीपार करावे, अशी मागणीदेखील निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी व मुरूड तहसीलदार यांना देण्यात येत आहे.

# दारू नको, दूध प्या! ‘अंनिस’सह विविध संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांचा उपक्रम

**पाली : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी ३१ डिसेंबरला सेलीब्रेशनच्या नावाखाली खास करून तरुण पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात व्यसनाचे आहारी जातांना दिसत आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टला प्रबोधन करण्यासाठी व व्यसनापासून तरुणांना दूर ठेवण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती तसेच विविध सामाजिक संघटना व सामाजिक कार्यकर्ते थर्टी फर्स्टला दुधाचे वाटप करणार आहेत.

अनेक तरुण-तरुणी ३१ डिसेंबरला व्यसनाचा पहिला अनुभव घेतात आणि पुढे जावून व्यसनाच्या आहारी जातात. या पार्श्वभूमीवर २८ डिसेंबर ते ३ जानेवारी या कालावधी मध्ये महाराष्ट्र अंनिस मार्फत चला व्यसन बदनाम करूया या मोहिमे अंतर्गत ‘दारू नको दुध प्या!’ हा उपक्रम राज्यभर राबवला जाणार आहे अशी माहिती डॉ. हमीद दाभोलकर, राहुल थोरात, फारुख गवंडी, मिलिंद देशमुख, विनोद वायंगणकर, मुक्ता दाभोलकर, प्रकाश घादगिने, राजीव देशपांडे, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे, सम्राट हटकर, मुंजाजी कांबळे,अशोक कदमआणि संदेश गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



**‘आयुष्य’तर्फे संकल्प व्यसनमुक्तीचा महायज्ञ**

आयुष्य व्यसनमुक्ती केंद्र अध्यक्ष तथा पाली शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उपाध्यक्ष अंकुश आपटे यांच्या संकल्पनेतून ३१ डिसेंबर रोजी पालीमध्ये २०० लिटर दूधाचे वाटप करण्यात येणार आहे. मंगळवारी (ता.३१) सायंकाळी ४ ते सायंकाळी ७:०० वाजेपर्यंत मोफत दूध वाटपाचा उपक्रम पालीतील छत्रपती संभाजी महाराज चौकमधली आळी येथे केला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये ठिक ठिकाणी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. पाली, पेण, अलिबाग व पनवेल आदी अंनिस शाखांमध्ये हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावेळी विविध प्रबोधनात्मक कार्यक्रम घेतले जातात असे अंनिस रायगड जिल्हा पेण शाखेचे पदाधिकारी संदेश गायकवाड यांनी सांगितले.

पंधरा वर्षा पासून महाराष्ट्र अंनिस ३१ डिसेंबरच्या आठवड्यात चला व्यसन बदनाम करूया ही मोहीम राबवते. सध्या समाजात व्यसनाचे उद्दात्तीकरण होताना दिसते आहे. यामुळे तरुण मुले व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे.

३१ डिसेंबरला लोकांनी दारू प्यावी म्हणून दारू दुकाने उशिरा पर्यंत चालू ठेवण्याची परवानगी शासन देते हे व्यसनाला बढावा देणारे धोरण शासनाने थांबवावे म्हणून जिल्हाधिकारी आणि तहसीलदार यांना ठिकठिकाणी निवेदन देण्यात येणार असल्याचे देखील पत्रकात नमूद केलेले आहे.

महाराष्ट्र अंनिस या सप्ताह अंतर्गत राज्यभरात व्यसन विरोधी युवा निर्धार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. व्यसनमुक्त व्यक्तीच्या हस्ते दारूच्या बाटलीला जोडे मारून मेळाव्याचे उदघाटन केले जाणार आहे. व्यसनमुक्ती दूताचे प्रशिक्षण घेतलेले युवक युवती पुढील आठवड्यामध्ये समाजात व्यसनच्या विरोधी पोस्टर प्रदर्शन, व्यसन विरोधी फिल्म शाळा कॉलेजमध्ये दाखवणे, गावामध्ये व्यसन विरोधी फेरीचे आयोजन करणे, शाळा कॉलेजमध्ये व्यसानाविषयी भाषण देणे, दारूच्या बाटलीला जोडे मारा आंदोलन,व्यसनविरोधी प्रतिज्ञा असलेल्या फ्लेक्स वर नागरिकांच्या सह्या घेणे, व्यसनमुक्त व्यक्ती आणि त्यांचे कुटुंबीय यांचा स्नेहमेळावे तसेच सोशल मिडियामध्ये व्यसन विरोधी संदेश प्रसारित करणे असे कार्यक्रम ठीकठिकाणी करणार आहेत.

## निवडक

### अपघातात सहा जण जखमी

**पनवेल :** वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार पदपथावरील सुरक्षा जाळीला धडकून अपघात झाल्याची घटना रात्री उशिरा मोठा खांदा येथील दोन ब्रिजमध्ये जेएनपीटी रोडवर कामोठे येथे घडली. या अपघातात कारमधील सहा जण जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. या अपघाताप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच या अपघातातील सर्व जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती कामोठे पोलिसांनी दिली आहे.

### डॉ. शुभदा नील यांना पुरस्कार

**पनवेल :** डॉ. शुभदा नील यांना टी. एम. जी क्रीयेशन्स व इनोव्हेटिव्ह मानबिंदू प्रकाशनच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे झालेल्या अनुभूती महागौरव संमेलनामध्ये राष्ट्रीय टी.एम.जी सुवर्णरत्न एक्सलन्स पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. या वेळी प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर व गर्भ संस्कार तज्ञ डॉ. शुभदा नील यांनी सर्वांना आहार, व्यायाम, प्राणायाम, मेडिटेशन व आजारांवर मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मदत केली. याबद्दल आयोजक एन. डी. खान व सलमा खान यांनी त्यांचे मनापासून आभार मानले.



# थर्टीफर्स्ट पार्ट्यांवर राहणार लक्ष

## पोलीस दक्ष; मद्यपी वाहनचालकांवरही होणार कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नववर्षाचे स्वागत करीत असताना थर्टीफर्स्टच्या रात्री शहरात कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी नवी मुंबई पोलिस सज्ज झाले आहेत. सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. शहरातील हॉटेल, बार, ऑर्केस्ट्रा बार, रेस्टॉरंट, परमिट रुम त्याचप्रमाणे फार्महाऊस, बंगले, समुद्र किनाऱ्यांवर होणाऱ्या नववर्ष स्वागताच्या पार्ट्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे.





शहरात मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला असून त्यासाठी अडीच हजार पोलिस अधिकारी-कर्मचारी, त्याशिवाय वाहतूक विभागाचे अधिकारी, कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. यात तीन पोलीस उपायुक्त, सहा सहाय्यक पोलीस आयुक्त, ५० पेक्षा अधिक पोलीस निरीक्षक, २०० सहाय्यक पोलीस निरीक्षक-पोलीस उपनिरीक्षक त्याचप्रमाणे १७०० पेक्षा अधिक पोलीस अंमलदारांचा समावेश आहे. त्याच प्रमाणे परिमंडळ स्तरावर आणि वाहतूक विभागाकडून शहराच्या प्रवेशद्वारावर, मुख्य चौकात, नाकाबंदी, गस्त, फिक्स पॉईंट, तसेच निर्जन स्थळी चेकिंगचे पॉईंट लावण्यात येणार आहेत. नवी मुंबईत परिमंडळ स्तरावर ठेवण्यात आलेल्या बंदोबस्तावर पोलीस उपायुक्त तसेच सहाय्यक पोलिस आयुक्त विभाग स्तरावरुन देखरेख करणार आहेत.

सागरी सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सागरी किनाऱ्यांवरदेखील पोलिसांचा विशेष बंदोबस्त तैनात ठेवण्यात येणार आहे. अमली पदार्थांचे व विनापरवाना मद्य, परदेशी मद्य पिणाऱ्यांवरदेखील असे नवी मुंबईचे पोलिस आयुक्त मिलींद भारंबे यांनी सांगितले आहे. बेवारस वस्तू, संशयित व्यक्ती, संशयित वाहने, मुलींची छेड काढणारे, अफवा पसरविणारे आदींची माहिती देण्यासाठी ११२ या हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहनदेखील पोलीस आयुक्तांनी केले आहे.

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरात असलेल्या हॉटेल्स, रिसॉर्ट व फार्म हाऊस तसेच बंगल्यामध्ये मोठ्या प्रमाणात पार्ट्या व रेव्ह पार्ट्या होतात. त्यात अमली पदार्थांचा वापर होतो. त्यामुळे अशा पार्ट्यांवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येणार आहे. या संदर्भात पनवेल परिसरातील ७० फार्महाऊस आणि आठ रिसॉर्टला मालकांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आलाय आहेत.

# भाजी विक्रेत्याला चाकूचा धाक दाखवून लुटले

**पनवेल : वार्ताहर**

एका भाजी विक्रेत्याला कारमधील चौघा लुटारूंनी चाकूचा धाक दाखवून तसेच मारहाण करून त्याच्या जवळची रोख रक्कम तसेच मोबाईल फोन लुटून पलायन केल्याची घटना कामोठे परिसरात घडली आहे. कामोठे पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात चौकडीविरोधात गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार अमरिशचंद्र जयस्वाल (वय ४०) हे कामोठे सेक्टर १० मध्ये राहतात. त्यांचा कामोठे सेक्टर-१९ मध्ये भाजी विक्रीचा व्यवसाय आहे. जयस्वाल हे दरदिवशी पहाटेच्या सुमारास एपीएमसी मार्केटमध्ये जाऊन भाजीपाला खरेदी करून आणतात. पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे आपल्या मोटारसायकलने कामोठे सेक्टर ६ मधील मानसरोवर हॉटेल येथे गेले. त्यानंतर तिथे आपली मोटरसायकल उभी केल्यानंतर ते एपीएमसी मार्केट येथे जाण्यासाठी मुंबई-पुणे मार्गावरील कामोठे ब्रिज लगतच्या सिग्नलजवळ वाहन चालकाकडून लिफ्ट घेण्यासाठी थांबले. दरम्यान, एका कार चालकाने जयस्वाल यांना आपल्या कारमध्ये बसवल्यानंतर कारमध्ये बसलेल्या तिघा लुटारूंनी जयस्वाल यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली.

यानंतर तिघा लुटारूंनी जयस्वाल यांना चाकू व इतर शस्त्रांचा धाक दाखवून त्यांच्याकडे असलेली ३५ हजारांची रक्कम आणि मोबाईल फोन काढून घेतला. त्यानंतर त्यांनी जयस्वाल यांना पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ गाडीतून खाली ढकलून देऊन तेथून पळ काढला. या प्रकारानंतर जयस्वाल यांनी प्रथम आपले घर गाठले. त्यानंतर कामोठे पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

## फसवणूकप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या आकुर्ली भागात साई रेसिडेन्सी या नावने इमारतीचे बांधकाम करणाऱ्या व्यावसायिकाने एका व्यावसायिकाकडून बांधकाम एका फ्लॅटच्या बुकिंगपोटी १८ लाख रुपये घेतले. त्या व्यावसायिकाला फ्लॅट अथवा त्याची रक्कमही परत न करता, त्याची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.

भरत रामावत असे या बिल्डरचे नाव असून खांदेश्वर पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

रामावत याने २०१८ मध्ये मे. ओम साई बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स या कंपनीच्या वतीने पनवेलच्या आकुर्ली भागात साई रेसिडेन्सी या नावाने इमारतीचे बांधकाम करण्यात येत असल्याची जाहिरातबाजी केली होती. तुर्भे येथील कपड्याचे व्यापारी नाथाराम चौधरी (वय ६२) यांनी १८ लाख रुपये भरून गृहप्रकल्पातील फ्लॅटचे बुकिंग केले. रामावत याने बुकींगधारकांना फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन दिले होते.

# विज्ञान प्रदर्शनात रामशेठ ठाकूर विद्यालयाचे सुयश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयास ५२व्या पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात सुयश मिळाले आहे. पनवेल पंचायत समिती पनवेल विभाग, पनवेल गणित, विज्ञान अध्यापक मंडळ आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे यांच्या संयुक्त विद्यमाने ५२वे पनवेल तालुका स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन २७ व २८ डिसेंबर २०२४ या दिवशी रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, उलवे येथे झाला.



या विज्ञान प्रदर्शनात राणी राहुल कडुसकर या सहाय्यक शिक्षिकेने 'शैक्षणिक साहित्य निर्मिती' यात Biology Diagram हा विषय घेऊन व्दितीय क्रमांक, अकरावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या सार्थक किर्तीकुमार महाडिक याने तालुका स्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत तृतीय क्रमांक त्याचप्रमाणे विमला मूलचंद खोरवाल हिला Lab Assistant या विभागात तृतीय क्रमांक मिळाला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. या सर्वांना प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी.देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी.गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## ज्येष्ठांसाठी विविध स्पर्धा

**नवी मुंबई :** महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ - फेस्कॅाम मुंबई व नवी मुंबई विभागातर्फे वर्ष २०२५च्या कॅरम, बुद्धिबळ तसेच गायन, उत्स्फूर्त वत्कृत्व, कथाकथन, सांघिक नृत्य, एक व व्दीपात्री अभिनय इत्यादी स्पर्धा त्यांच्या सभासद सदस्यांकरिता भरविण्यात येत आहेत. यावर्षी निबंध व चित्रकला स्पर्धाही घेण्याचे आयोजिले आहे. स्पर्धेचे स्थळ, तारिख व वेळ लवकरच जाहीर करून सर्व ज्येष्ठ नागरिक सभासद संघांना व्हॉट्सॲपव्दारे व लेखी कळविण्यात येईल असे फेस्कॅाम मुंबई व नवी मुंबई विभागातर्फे निवेदन प्रसारित करण्यात आले आहे. स्पर्धेत भाग घेणेसाठी अर्ज १५ जानेवारी २०२५ पर्यंत करावा, संपर्क अध्यक्ष सुरेश पोटे ९३२२४०१९६५ यांच्याशी करावा, असे आवाहन केले आहे.

# पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात गव्हाण विद्यालयाच्या शिक्षकांची बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका पंचायत समिती शालेय शिक्षण विभाग, गणित विज्ञान अध्यापक मंडळ व रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २७ व २८ डिसेंबर रोजी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल मध्ये झाले.





या प्रदर्शनात शिक्षकांसाठी असलेल्या शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा प्रकारात नववी ते बारावी या माध्यमिक गटात रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे विज्ञान शिक्षक शितलकुमार म्हात्रे यांच्या 'अ अ अणूचा' ह्या शैक्षणिक साहित्य निर्मितीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले असून त्यांची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे. पहिली ते आठवी या प्राथमिक गटात शिक्षकांसाठीच्या शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धा प्रकारात विद्यालयाच्या उपशिक्षिका द्रौपदी रमेश वर्तक यांच्या 'चला सोप्या कृतींतून शिकूया' या साहित्य निर्मितीस द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

या दोन्ही अध्यापकांना अनुक्रमे जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व अध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत आणि राष्ट्रीय बाल विज्ञान परिषद राज्य समन्वयक विश्वास कोरडे यांच्या शुभहस्ते प्रशस्तीपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मिती करणाऱ्या शिक्षकांच्या स्पर्धेमध्ये ३५ शिक्षकांनी सहभाग नोंदवला. त्यात दोन्ही गटातून प्रत्येकी तीन क्रमांक बक्षीस पात्र ठरले. यातील माध्यमिक गटात प्रथम व प्राथमिक गटात द्वितीय असे दोन क्रमांक प्राप्त करून अनुक्रमे शितलकुमार म्हात्रे व द्रौपदी वर्तक या गव्हाण विद्यालयाच्या शिक्षकांनी बाजी मारली.

## बालवैज्ञानिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण विद्यालयाच्या बाल वैज्ञानिकांनी ही खूप चांगला प्रयत्न केला. स्वतःच्या कुशाग्र बुद्धिमत्तेतून साकारलेल्या वैविध्यपूर्ण प्रतिकृतींची वाहवा झाली.

हिंदवी रवींद्र भोईर, प्रज्ञा मनोज पाटील, सात्विक रवींद्र भोईर, वेद घरत, अजिंक्य पाटील या सर्व बालवैज्ञानिकांचेही उत्स्फूर्त सहभागाबद्दल कौतुक होत आहे. तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण समारंभास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह अरुणशेठ भगत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, पनवेल महापालिकेचे शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मोरु नारायण म्हात्रे विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन भार्गव ठाकूर, गव्हाण विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, माजी उपसरपंच विजय घरत, रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य गणेश ठाकूर तसेच रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या प्राचार्या, इतर अनेक विद्यालयांतील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

पारितोषिक प्राप्त शिक्षकांना गव्हाण विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले यांचेसह विज्ञान प्रदर्शन विभागाचे प्रमुख तथा विद्यालयाचे गुरुकुलप्रमुख संदीप भोईर, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर आणि इतर विज्ञान शिक्षकांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाची क्षेत्रभेट





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयातील गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे क्षेत्रभेट रामबाग व टी.एस. रहमान म्युझियममध्ये सोमवारी (दि.३०) नेण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी तयार केलेल्या व पर्यटकांसाठी पर्वणी असलेल्या रामबागेमध्ये इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट नेण्यात आली होती. रामबागेतील विविध औषधी वनस्पती यांची माहिती विद्यार्थ्यांना तेथे देण्यात आली. त्याच बरोबर तेथील मनमोहक दृश्य, विविध फुलांनी बहरलेली रोपे, जागृत दैवत म्हस्वेश्वराचे मंदिर आणि सर्व परिसर बघून मुलं मंत्रमुग्ध झाली.

त्यानंतर विद्यार्थ्यांना टी.एस. रेहमान येथील म्युझियम पाहण्यासाठी नेण्यात आले ५० वर्षांपूर्वीचे म्युझियम तेथील वस्तूंची मांडणी, तेथील लाकडी काम पाहून मुलांना ऐतिहासिक वास्तूची माहिती मिळाली.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी या क्षेत्रभेटीचे नियोजन केले होते. आठवीच्या वर्गाच्या वर्गशिक्षिका वेदांगी म्हात्रे, नववी वर्गाच्या वर्ग शिक्षिका पल्लवी पवार व दहावीच्या वर्गाच्या वर्ग शिक्षिका विशाखा गावंड त्याचबरोबर अशोक ठाकूर शिपाई या सर्वांसमवेत मुलांनी क्षेत्रभेटीचा आनंद घेतला.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी आपल्या ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांना, लहान मुलांना तसेच प्रौढांना फिरण्यासाठी, विसावण्यासाठी, मॉर्निंग वॉक साठी, खेळण्यासाठी, विरंगुळ्याचे ठिकाण म्हणून अतिशय भव्य, दिव्य अशी रामबाग लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांनी उभारली हे सांगताच व प्रत्यक्ष रामबागेतील कारंजे, विविध रंगाची, आकाराची फुले विविध प्रकारच्या रोपांच्या जाती बघून मुलांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

रामबाग व टी. एस. रेहमान म्युझियम पाहण्यासाठी सौ शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या सी.बी.. एस.ई.बोर्डच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी स्कूलबस उपलब्ध करून दिल्या.



**पनवेल :** भाजप अनुसूचित जाती सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष तथा माजी जि.प.सदस्य अमित जाधव यांच्या आई स्व. सुनीता मोहन जाधव यांची सोमवारी द्वितीय पुण्यतिथी होती. यानिमित्त त्यांच्या स्मरणार्थ संपूर्ण जाधव कुटुंबाने जीवन ज्योत वृद्धाश्रमात सदिच्छा भेट दिली. या भेटीमध्ये भिंतीवरील पाच घड्याळे भेट म्हणून देण्यात आली. या वेळी शैलेश जाधव, प्रगती शैलेश जाधव, प्राची जाधव, प्रमोद धोत्रे, नंदिनी धोत्रे, हुसेन मुबारक मुलानी आदी उपस्थित होते.



**पनवेल :** सीए परीक्षेमध्ये कृणाल खरात याने उत्तीर्ण होऊन घवघवीत संपादन केले. त्याला पुढील यशस्वी वाटचालीसाठी महापालिकेच्या माजी सभापती सुशीला जगदीश घरत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी पनवेल वैद्यकीय सेलच्या अध्यक्ष डॉ. अस्मिता जगदीश घरत व इतर उपस्थित होते.

## संपादकीय

# विकासाला गती मिळेल!

तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज अशा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी या क्षेत्रात उत्कृष्ट अशा सामाजिक व पायाभूत सुविधाही विकसित केल्या जाणार आहेत. या साऱ्यातूनच मोठ्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीची शक्यता आहे.

**रविवारी दुपारी पावणेदोनच्या सुमारास इंडिगो एअरलाइन्सचे ए३२० विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीवर उतरवण्यात आले. यावेळी पारंपरिक पद्धतीने फायर टेंडरने पाण्याचे फवारे मारून विमानाचे जोरदार स्वागत करण्यात आले. अशातऱ्हेने नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीवर पहिले व्यावसायिक विमान उतरवण्यात नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लि. यशस्वी झाल्याने या धावपट्टीची व्यावसायिक उड्डाण प्रमाणीकरण चाचणीही यशस्वी झाली आहे. त्यामुळे डीजीसीएद्वारे एरोड्रोम परवाना मंजुरीचा एनएमआयएचा मार्ग मोकळा झाला आहे. येत्या १७ एप्रिलला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी मुंबईतून पहिले विमानोड्डाण करण्याचा सर्वसंबंधितांचा प्रयत्न आहे. राज्यातील पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, जल, हवाई मार्गांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्याचा प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यात यावी. या कामांना केंद्रसरकारबरोबरच राज्य सरकारकडून भरीव स्वरुपाचे सहकार्य केले जाईल अशी ग्वाहीही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारीच महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत दिली आहे. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी रत्नागिरी, शिर्डी, अमरावती आदी राज्यभरातील अनेक विमानतळांच्या कामांच्या कार्यवाहीचा सविस्तर आढावादेखील घेतला आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचाही एकेक टप्पा पार होत असून रविवारी व्यावसायिक विमानाचे यशस्वी लँडिंग झाल्याने प्रत्यक्ष विमानतळ लवकरच सुरू होण्याच्या आशा उंचावल्या आहेत. गेल्या ११ ऑक्टोबरला भारतीय वायुसेनेचे सी-२९५ हे विमान धावपट्टीवर उतरवण्यात येऊन धावपट्टीची पहिलीवहिली चाचणी घेण्यात आली होती. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जगातील सर्वात मोठ्या ग्रीनफील्ड विमानतळांपैकी एक आणि देशातील पहिली अर्बन मल्टी एअरपोर्ट सिस्टीम ठरणार आहे. या विमानतळाने नवी मुंबई थेट जगाशी जोडले जाणार असून नवी मुंबईबरोबरच राज्याच्या व देशाच्या विकासासही गती येणार आहे. या विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे यासाठी भूमिपुत्रांनी संघर्ष केला आहे. या विमानतळामुळे राज्याचा एक टक्का जीडीपी वाढणार असून एक लाख लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहे. या विमानतळामुळे फक्त जागतिक दर्जाची विमान वाहतूक सुविधा पुरवली जाणार नसून या संपूर्ण क्षेत्राचा सर्वांगीण विकासही त्यामुळे प्रत्यक्षात साकारेल. आजच्या घडीला या विमानतळ उभारणीचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. पहिल्या टर्मिनलचे उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करून येत्या १७ एप्रिलला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत नवी मुंबईतून पहिले विमान उडवण्याचे नियोजन आहे. शिल्लक कामे लक्षात घेऊन संबंधितांना शिताफीने पहिल्या टर्मिनलचे काम पूर्ण करावे लागणार आहे. मुंबई विमानतळावरून सध्या वर्षाला पाच कोटी प्रवासी प्रवास करतात. नवी मुंबई विमानतळ पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर या विमानतळावरून वर्षाला सहा कोटी प्रवासी प्रवास करतील अशी अपेक्षा आहे. २०३० पर्यंत मुंबई महानगर प्रदेशातून प्रतिवर्ष १० कोटी प्रवासी हवाई प्रवास करतील असा अंदाज आहे. नवी मुंबई विमानतळावरून प्रतिवर्षी १५ लाख टन मालवाहतुकीचेही नियोजन आहे.**

# समृद्ध करणारी अटल करंडकची आनंददायी प्राथमिक फेरी



गेले १५ दिवस अत्यंत नाट्यमय वातावरणात गेले. निमित्त होतं अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा आणि सीकेटी महाविद्यालय (स्वायत्त) आयोजित अटल करंडक २०२४ ही राज्यस्तरीय मराठी एकांकिका स्पर्धा. गेले दोन वर्ष आयोजक परीक्षणासाठी आमंत्रण देत होते, पण नाटकाचे प्रयोग सुरू होते आणि तितका वेळ सलग देणे शक्य नसल्याने नकार द्यावा लागत होता, परंतु तो योग ह्या वर्षी जुळून आला. त्यात आणखी गंमत म्हणजे मी आणि मानसी (पत्नी) दोघेच परीक्षक असल्याने परीक्षकांशी ट्युनिंग जमण्याचे टेन्शनच नव्हते. दडपण एकाच गोष्टीचे होते ते म्हणजे जळगाव, पुणे, कोल्हापूर, पनवेल ह्या ठिकाणी जवळजवळ सलग १५ दिवस जाणे आणि जवळपास १०० एकांकिकांचे परीक्षण करणे. मुळातच नाटकाची प्रचंड आवड असल्याने आणि आयोजकांच्या अत्यंत सुंदर नियोजनामुळे हा पंधरा दिवसांचा 'अटल करंडक नाट्य प्रवास' आज प्राथमिक फेरीचा निकाल आयोजकांच्या हाती देऊन संपला.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांतजी ठाकूर आणि पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते आणि ह्या स्पर्धेचे स्पर्धाप्रमुख परेशजी ठाकूर हे बंधू सुरुवातीला आठ वर्ष 'मल्हार करंडक' ह्या नावाने आणि गेली ११ वर्ष 'अटल करंडक' ह्या नावाने सातत्याने गेली १९ वर्ष ही महाएकांकिका स्पर्धा आयोजित करीत आहेत. प्रतिवर्षी नावीन्यपूर्ण बदल करत ह्या स्पर्धेचे दिमाखदार आयोजन केले जाते. राजकीय क्षेत्रात असूनही आपलं कलाक्षेत्राशी असलेलं घट्ट नातं आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने अधिकाधिक दृढ करीत राहणं ही साधी गोष्ट नाही. सूत्रबद्ध नियोजन, परीक्षक आणि स्पर्धक दोघांचीही आपुलकीने काळजी घेणारे, उत्तम मान सन्मान देणारे आणि उत्कृष्ट निवास, प्रवास आणि भोजन व्यवस्था करणारे हे आदर्श संयोजक आहेत. अमोल खेर, गणेश जगताप, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, श्यामराव पुंडे ह्यांच्यासारखे कलासक्त रंगकर्मी आणि सीकेटी कॉलेजचे कलाप्रेमी विद्यार्थी ह्यांच्या साथीने ही स्पर्धा प्रतिवर्षी यशस्वी करीत आहेत.

विविध केंद्रांवर आयोजित केलेली प्राथमिक फेरी, विभागवार अंतिम फेरीसाठी केलेली एकांकिकांची निवड आणि कडक शिस्त ह्यामुळे ही स्पर्धा एकांकिका स्पर्धांमध्ये आयोजनाच्या बाबतीत आदर्श घालून देणारी स्पर्धा आहे. अटल करंडक स्पर्धेतील विजेते आणि कलाक्षेत्रातील उत्तम कामगिरी करणारे कलावंत प्रतिवर्षी ह्या स्पर्धेचे ब्रँड अँबेसेडर असतात. ह्या वर्षी हा मान अभिनेत्री रूचिरा जाधव हिला प्राप्त झालेला आहे.

ह्या स्पर्धेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे एकही एकांकिका रिपीट झाली नाही. आयोजक प्रवेश अर्ज घेताना केवळ संस्थेचे नाव, विभाग, पत्ता आणि नाममात्र प्रवेश मूल्य घेतात. थेट प्रत्यक्ष सादरीकरण करतानाच आयोजकांनादेखील कुठल्या एकांकिका सादर होणार आहेत हे कळते. विषयांचे वैविध्य, तरुण लेखकांच्या नव्या संहिता आणि स्पर्धकांची कष्ट घेण्याची तयारी, उत्साह आणि नवनवीन प्रयोग रंगमंचावर करण्याची जिद्द ह्या स्पर्धेत दिसून आली आणि मराठी रंगभूमी कधीही बंद पडणार नाही ह्याची खात्री वाटली. स्पर्धेत जसे भाषेवरचे प्रभुत्व असलेले रंगकर्मी बघितले तसेच सदोष उच्चार करणारेदेखील रंगकर्मी बघितले. संहितेची निवड, पात्र योजना, विषयाचे आकलन, भूमिकेची समज, रंगमंचावरील वावर आणि अंगिक, वाचिक अभिनय ह्यावर अनेक कलाकारांनी तसेच सादरीकरण करणाऱ्या संस्थांनी विचार करणे गरजेचे वाटले. अर्थात, अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या एकांकिका कोणत्या आहेत हे बघितले की ते लक्षात एखादी एकांकिका ग्रामीण भाषेत असेल आणि असलेली पात्रे ग्रामीण भाषेत बोलणारीच असतील तर गोष्ट वेगळी, परंतु संहिता, पात्र जर प्रमाण भाषेत लिहिलेली असतील तर अशावेळी संवाद प्रमाण भाषेतच बोलले जाणे गरजेचे आहे. अनेक तरुण रंगकर्मींमध्ये ही भाषेची समस्या असल्याचे दिसून आले. त्यावर कठोर मेहनत घेऊन रंगकर्मींनी प्रभुत्व मिळविणे गरजेचे आहे. कारण कितीही तांत्रिक बाबींची मदत होत असली तरी अभिनय, शब्दोच्चार ह्या गोष्टी रंगभूमीवर जास्त महत्वाच्या आहेतच.

अनेक एकांकिकांमध्ये दिग्दर्शकाने स्वातंत्र्य (लिबर्टी) घेऊन केलेले बदल हे मूळ संहितेपेक्षा कित्येक पटीने जास्त केलेले दिसून आले. कुठलाही लेखक हा काही विचार करूनच संहिता लिहीत असतो काही प्रमाणात दिग्दर्शकीय बदल, स्वातंत्र्य गृहीत धरले तरी त्याचे प्रमाण ठरवून घेणे आवश्यक आहे. जी एकांकिका आपण जशी सादर करणार आहोत तीच संहिता परीक्षकांना देणे आवश्यक आहे ह्याचे भान अनेक संस्थांना नसल्याचे दिसून आले. केवळ स्पर्धेत उतरायचे म्हणून योग्य मार्गदर्शन न घेता सादरीकरण करण्यात आलेले देखील दिसून आले. स्पर्धेत प्रवेश घ्यायचा म्हणजे आर्थिक, मानसिक, शारीरिक आणि वेळेची गुंतवणूक असते अशावेळी आपली मेहनत ही 'गाढव मेहनत' ठरू नये एवढीच अपेक्षा. ह्याशिवाय पाठांतर चोख आहे म्हणजे आपण एकांकिका छान करतो हा गैरसमज काढून टाकणे आवश्यक आहे. खणखणीत पाठांतर म्हणजे अभिनय नाही.

निकाल निकष - वर उल्लेख केल्याप्रमाणे आयोजकांच्या सूचनेप्रमाणे विभागवार निवड आणि उत्तम संहिता, दर्जेदार सादरीकरण, विषयांचे वैविध्य आणि अंगिक वाचिक अभिनयाला महत्त्व देण्यात आलेले आहे. कुणावरही अन्याय होणार नाही ह्याची काळजी घेण्यात आलेली आहे. आम्ही दोघेही अनेक वर्षे एकांकिका, नाट्य स्पर्धांमधून सहभागी होत असल्याने स्पर्धकांच्या मानसिकतेची आम्हाला पुरेपूर कल्पना आहे. अंतिम फेरीसाठी पात्र ठरविणाऱ्या निकालात सर्वोत्तम ठरलेल्या एकांकिकाच निवडण्यात आलेल्या आहेत, ह्याचा अर्थ अंतिम फेरीसाठी पात्र न ठरलेल्या इतर एकांकिका वाईट आहेत असा अर्थ कृपया स्पर्धक संघानी काढू नये. जवळपास शंभर एकांकिकांमधून फक्त पंचवीस एकांकिका अंतिम फेरीसाठी पात्र असल्यामुळे काही निवड न झालेल्या एकांकिकांमध्ये अत्यंत किरकोळ गुणांचा फरक आहे ह्याची नोंद घ्यावी. एकांकिका झाल्यानंतर स्पर्धक संघांशी आम्ही संवाद साधला त्यात आम्ही तसे आमचे त्या त्या एकांकिकेबद्दलचे मत त्या त्या संघाकडे प्रकट केलेले आहेच.

अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या पंचवीस एकांकिकांची नावे जाहीर करण्यात आलेली आहेत. ह्या व्यतिरिक्त काही एकांकिका आम्ही विशेष शिफारस करून आयोजकांकडे यादी दिलेली आहे. जर काही कारणास्तव अंतिम फेरीत निवड झालेल्या कुणा स्पर्धक संघाने अंतिम फेरीसाठी उपलब्ध नसल्याचे कळविले तरच त्या उर्वरित एकांकिकांमधून पुढील संघ निवडण्याची जबाबदारी संयोजकांनी पार पाडायची आहे. एकंदर प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झालेली ही प्राथमिक फेरी होती. आता उत्सुकता आहे ती आम्ही निवड केलेल्या एकांकिकांची अंतिम फेरीतील कामगिरी बघण्याची. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल ह्या ठिकाणी भव्य आणि दिमाखदार आयोजनात ही स्पर्धा दिनांक १०, ११ आणि १२ जानेवारी २०२५ रोजी संपन्न होणार आहे. आम्ही तर आहोतच, तुम्हीदेखील या आणि अविस्मरणीय क्षणांचे साक्षीदार व्हा.

अंतिम फेरीसाठी पात्र ठरलेल्या संघांसाठी विशेष सूचना - संयोजक, सादरीकरण आणि तांत्रिक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक संघाला ६० मिनिटांचा कालावधी देतात, आणि ह्या नियमाचे ते कठोर पालन करतात त्यामुळे स्पर्धक संघांनी ह्याची वेळेत अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे; अन्यथा आपली एकांकिका स्पर्धेतून बाद होऊ शकते ह्याची नोंद घ्यावी. ह्यापूर्वी चांगले सादरीकरण करणारे संघ बाद झालेले आहेत ह्याची विशेष नोंद घ्यावी. धन्यवाद!

**-आशीर्वाद मराठे, मानसी मराठे**




# यु ट्युबवर काय बघायचं? 'हे' फीचर करील तुमची मदत

युट्युब प्ले समथिंग बटण! (यूट्यूब) हे सर्वोत्कृष्ट व्हिडीओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मपैकी एक आहे. इथे एखादे गाणे ऐकणे, एखादा चित्रपट, मालिका, लहान मुलांसाठी आवडती गाणी, गोष्टी ऐकणे व पाहणे अगदी सहज सोपे जाते. पण, कधी कधी तुम्हाला योग्य व्हिडीओ किंवा तुम्हाला पाहिजे तसा व्हिडीओ शोधण्यासाठी संघर्ष करावा लागतो. तर, या स्क्रोलिंग समस्यांचा अंत करण्यासाठी, यूट्यूब नवीन 'प्ले समथिंग' फ्लोटिंग ॲक्शन बटणाची चाचणी करीत आहे.




९ ते ५ गुगलच्या अलीकडील अहवालानुसार नवीन ' प्ले समथिंग 'बटण काळ्या पार्श्वभूमीसह आणि तळाच्या पट्टीच्या अगदी वर पांढऱ्या मजकुरासह दिसते. या बटणावर टॅप केल्याने शॉर्ट्स प्लेअरमधील एखादा व्हिडीओ प्ले होईल. हे फीचर युजर्सना त्याच्या अनुभवावर आधारित नवीन व्हिडीओही दाखवेल.

उदाहरणार्थ- जर एखाद्या युजरला रोमँटिक गाणी पाहणे आवडत असेल, तर हे फीचर त्याला तसा कन्टेन्ट पोहोचवण्यात मदत करील. पण, असे दिसून आले की, प्लेअरच्या तळाशी असलेल्या टाइमलाइन स्क्रबरसह स्क्रीनच्या उजव्या बाजूला दिसणाऱ्या लाइक, डीसलाइक, कमेंट्स आणि शेअर बटणासह बटण पोर्ट्रेट मोडमध्ये नियमित कन्टेन्टसुद्धा प्ले करू शकते, पण जेव्हा मिनी प्लेअर ॲक्टिव्ह असतो तेव्हा 'प्ले समथिंग' बटण अदृश्य होते.

यूट्यूबने 'प्ले समथिंग फीचर'चा प्रयोग करण्याची ही पहिलीच वेळ नाही. २०२३ मध्ये एका युजर्सने काय पाहायचे ते ठरवू शकत नाही? असा मजकूर लिहिलेला बॅनर आणि तळाशी 'प्ले समथिंग बटण' दिसणारा एक फोटोसुद्धा शेअर केला होता.

नवीन 'प्ले समथिंग ' बटण सर्व युजर्ससाठी केव्हा आणले जाईल हे अद्याप अस्पष्ट आहे. पण, २०२४ वर्षाच्या सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे यूट्यूबमध्ये ते नवीन सुधारणा आणि फीचर्सचा एक समूह घेऊन येणार आहेत. त्यात प्लेलिस्टसाठी लघु प्रतिमा सेट करण्याची क्षमता, स्लीप टायमर सेट करणे, मिनी प्लेअर पुन्हा डिझाइन करणे आदी अनेक गोष्टी असणार आहेत. एकंदर नवीन फीचर तुम्हाला मदत करणार आहे.

# शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई



### निमित्त

डॉ. विक्रम अंबालाल साराभाई हे एक सुप्रसिद्ध भारतीय भौतिकशास्त्रज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ होते. १२ ऑगस्ट १९१९ मध्ये जन्मेले विक्रम साराभाई ह्यांनी भारतीय अंतराळ कार्यक्रमाला जन्म दिला. ह्यांचा जन्म अहमदाबाद येथील एक धनाढ्य व्यावसायिक कुटुंबात झाला होता.

भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक म्हणून ह्यांनी देशाला अंतरिक्षमध्ये पोहोचण्यात खूप मदद केली आणि देशात परमाणू शक्ती विकसित करण्यामध्ये देखील आपले योगदान दिले. डॉ. विक्रम साराभाई ह्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगलोर येथे भौतिकशास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रमण यांच्या मार्गदर्शनात आपला पहिला संशोधन लेख टाईम डिस्ट्रिब्युशन ऑफ कॉस्मिक रेज प्रोसिडिंग ऑफ द इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेस मध्ये प्रकाशित केला. साराभाई यांनी १९४०-४५ या कालावधीत वैश्विक किरणांवरील संशोधन कार्यामध्ये बेंगळुरू येथील गीगर-मुलर काउंटर आणि काश्मीर-हिमालयातील उच्चस्तरीय केंद्रावरील वैश्विक किरणांच्या काळातील फरकांचा अभ्यास केला.

१९६६मध्ये भौतिकशास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगीर भाभा ह्यांच्या निधनानंतर डॉ. विक्रम साराभाई ह्यांना भारतीय अणुऊर्जा आयोगचे अध्यक्ष बनवले गेले. भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्था (इसरो) ह्याची स्थापना यांनी केलेल्या अनेक महत्वाच्या कार्यांपैकी सर्वात मोठी उपलब्धी आहे. रशियन उपग्रह 'स्पुतनिक' ह्याचे प्रक्षेपणानंतर भारतासारख्या विकासशील देशासाठी अंतराळ कार्यक्रमाचे महत्वाबद्दल त्यांनी सरकारला समजवले डॉ. विक्रम साराभाई हे अंतराळ कार्यक्रमाच्या महत्त्वावर जोर देऊन म्हणाले-राष्ट्राचा विकास हा तेथील लोकांच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या आकलनाशी आणि वापराशी घनिष्ठपणे जोडलेला आहे.

डॉ. साराभाई यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या भारतीय उपग्रह 'आर्यभट्ट' च निर्माण कार्य सुरु झाले आणि १९७५ मध्ये रशियन उपग्रह प्रक्षेपण वाहनाच्या मदतीने प्रक्षेपित केलं गेलं. ह्याप्रमाणे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात झाली.

डॉ. विक्रम साराभाई यांचा विवाह सुप्रसिद्ध शास्त्रीय नृत्यांगना मृणालिनी स्वामिनाथन ह्यांच्यासोबत झाला होता. ह्या दोघांनी कलाचे प्रचार आणि शिक्षणासाठी १९४९मध्ये 'दर्पण अकादमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स' ह्याची स्थापना केली. ह्यांनी भारताचे फार्मास्युटिकल उद्द्योगात देखील महत्वाचे योगदान दिले. हे फार्मास्युटिकल उद्योगात इलेक्ट्रॉनिक डेटा प्रोसेसिंग आणि ऑपरेशन्स रिसर्च तंत्र लागू करणारे पहिले व्यक्ती होते. ह्यांच्या सतत प्रयत्नांमुळे भारत औषध उद्योगात स्वावलंबी बनले. भारतीय प्रबंधक संस्थान,अहमदाबाद ह्याची स्थापना करण्यामध्ये देखील ह्यांनी सहकार्य दिलं.

१९६२मध्ये डॉ. विक्रम साराभाई ह्यांना शांती स्वरूप भटनागर मेडल देण्यात आला. १९६६मध्ये पद्मभूषण आणि १९७२मध्ये पद्मविभूषण दिले गेले. ३१ डिसेंबर १९७१ मध्ये ह्यांचे निधन झाले.

तिरुअनंतपुरम येथील थुंबा इक्वेटोरियल रॉकेट लॉन्चिंग स्टेशन आणि संबंधित अवकाश संस्थांचे नामकरण महान शास्त्रज्ञाच्या सन्मानार्थ विक्रम साराभाई स्पेस सेंटर असे करण्यात आले. हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थाचे प्रमुख अंतराळ संशोधन केंद्र म्हणून उदयास आले आहे. १९७४ मध्ये सिडनीस्थित इंटरनॅशनल अॅस्ट्रॉनॉमिकल युनियनने ठरवले की 'सी ऑफ सेरेनिटी' वरील बेसाल्ट मून क्रेटर आता साराभाई विवर म्हणून ओळखले जाईल.१९७२ मध्ये त्यांच्या मृत्यूच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय टपाल विभागाने एक टपाल तिकीट जारी केले होते. **(साभार : वेबदुनिया)**

### क्लिक...क्लिक...!




अलिबाग : नवीन वर्षाच्या स्वागतासाठी नगरपालिकेकडून रोषणाईसह रोडची साफसफाई करण्यात आली आहे. (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यामध्ये ऊन अंगावर घेताना कोणती काळजी घ्याल?

आतप म्हणजे ऊन. आयुर्वेदाने हिवाळ्यातल्या दिवसांमध्ये उन्हाचे सेवन करण्याचा सल्ला दिलेला आहे. हिवाळ्यामध्ये आतप सेवनाचा दिलेला सल्ला हा आरोग्यदायीच असतो, यामध्ये शंका नाही. हेमंत-शिशिरातल्या गारठ्याच्या दिवसांमध्ये अंगाला ऊब देणारे ऊन सर्वांनाच हवेहवेसे वाटते, ज्याचा शक्य होईल तितका आनंद प्रत्येकाने घ्यावा. त्यातही थंडी हा निसर्गतः शरीरामध्ये थंड, गोड, जड, स्निग्ध, बुळबुळीत गुणांचा कफ जमण्याचा (कफसंचयाचा) ऋतू असल्याने आणि ऊन त्या कफाच्या गुणांच्या विरोधी असल्याने या दिवसांमध्ये केलेले उन्हाचे सेवन कफ जमण्यास विरोध करणारे ठरते.



एकंदरच हिवाळ्यात उन्हाचे सेवन करणे आरोग्याला हितकर ठरते, त्यातही ज्यांच्या शरीरामध्ये मुळातच थंडावा अधिक असतो, अशा वात व कफ प्रकृतीच्या व्यक्तींनी एक तर थंडीमधून अचानक कडक उन्हात जाऊ नये. गारव्यामधून अचानक उष्म्यामध्ये जाणे आरोग्यासाठी हितकर नसते. हा शीत-उष्ण व्यत्यास शरीराची तापमान यंत्रणा बिघडवू शकतो. त्यामुळे गारठ्यामधून बाहेर पडल्यावर आधी सावलीमध्ये थोडा वेळ थांबून मग उन्हामध्ये जावे, शक्यतो शरीराला सुखद वाटेल असे ऊन अंगावर घ्यावे. गारठ्यामधून बाहेर पडल्यावर थेट सुर्याकडे पाहू नये.शिवाय, ऊन घेतल्यानंतर शरीराला वारा लागणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. अंगावर ऊन घेतल्यामुळे शरीराला ऊब मिळते तेव्हा शरीराचे बाह्य तापमान गरम झालेले असते, अशा वेळेस त्वचेला गार वारे लागणे योग्य नाही. ते आरोग्यास हितकर होत नाही.

हिवाळ्यामध्ये सूर्यदर्शन नेहमीच होत नसल्याने सूर्यकिरणे शरीरावर न पडल्याने जाणवणारी ड जीवनसत्त्वाची कमतरता ही गंभीर समस्या ठरते. ड जीवनसत्त्वाच्या अभावी हाडे कमजोर होतात, स्नायू सैल पडतात, शरीराची ताकद कमी होते, रोगप्रतिकारशक्ती घटते, केस गळू लागतात, मानसिक त्रास सारखा होतो, मन अनुत्साही व निराश होते. या बहुतांश तक्रारी उन्हाचे म्हणजेच सूर्यकिरणांचे सेवन केल्यावर निघून जातात. सर्वसाधारणपणे सूर्यकिरणांमधील अल्ट्राव्हायोलेट (अतिनील) किरणांचा त्वचेशी होणारा संपर्क ड जीवनसत्त्वाच्या निर्मितीला चालना देत असल्याने; ज्या वेळी या किरणांचे प्रमाण सूर्यप्रकाशात सर्वाधिक असते, त्या वेळी म्हणजे सकाळी १० ते दुपारी २ या तासांमधील सूर्यकिरणे तुलनेने अधिक उपयुक्त ठरतात.

# परतीच्या प्रवासातही उसळली तोबा गर्दी

# पर्यटकांचे मेगा हाल!

**अलिबाग : प्रतिनिधी**

शनिवार रविवार सुटयांचा आनंद घेण्यासाठी रायगडमध्ये आलेल्या पर्यटकांचे परतीच्या प्रवासात चांगलेच हाल झाले. अलिबाग एस टी स्थानकांत प्रवाशांची तोबा गर्दी झाली होती. तिकीट काढण्यासाठी अलिबाग एस टी स्टँडवर मोठी रांग लागली होती. त्यांना बसची वाट पहात तासनतास ताठकळत उभे रहावे लागले.

पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक मागील दोन दिवस अलिबागमध्ये आले होते. अलिबाग, नागाव, किहीम, रेवदंडा अशा किनारयांवर पर्यटकांनी दोन दिवस मनमुराद आनंद लुटला. आज दुपारनंतर ते पुन्हा आपल्या घराकडे जायला निघाले. मात्र एसटी बसेस पुरेशा नसल्याने त्यांना खूपच त्रास सहन करावा लागला. अलिबाग ते पनवेल मार्गावर धावणार्या बसेस अपुर्या पडत होत्या. एरव्ही या मार्गावर विनावाहक धावणार्या बसेस मध्ये उभे राहून प्रवास करण्याची मुभा नाही. मात्र आज प्रवाशांना उभे राहून प्रवास करू दिला जात होता. ज्या बसेस पनवेल मार्गावर धावत होत्या. त्या वाहतूक कोंडीत अडकून पडल्या होत्या. या वाहतूक कोंडीचा फटका प्रवाशांना बसला. प्रवाशांना अधिकच्या बसेस उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे आगार व्यवस्थापक राकेश देवरे यांनी सांगितले.

दुसरीकडे जलमार्गावरून प्रवास करणार्यांची संख्या मोठी होती. जलमार्गावरील बुकींग फुल झाल्याने पर्यटकांना एस टी बसचा पर्याय निवडावा लागला. मात्र तेथे तासनतास वाट पाहून वैतागलेल्या प्रवाशांनी अधिकचे पैसे देवून खाजगी वाहतूकीचा पर्याय निवडला.



# गतिमान महायुती सरकारच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी दक्ष : खासदार सुनील तटकरे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील उपविभागीय कार्यालयात एक महत्त्वाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सुनील तटकरे उपस्थित होते. त्यांनी उपस्थित अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते आणि नागरिकांना मार्गदर्शन करताना समाजातील प्रगतीसाठी विकासकामांची आवश्यकता स्पष्ट केली.

खासदार तटकरे म्हणाले की, जीवनातील आनंद मिळवण्यासाठी समाजात समग्र विकास घडविणे आवश्यक आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून विविध निधी आणून हे काम करण्यास कटिबद्ध आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून विकासकामांची कार्यवाही सुरू आहे आणि सध्याचे सरकार गतिमान असून विविध योजनांची अंमलबजावणी अत्यंत दक्षतेने केली जात आहे.

तटकरे यांनी पुढे सांगितले की, २०२४च्या नवीन आर्थिक वर्षात अर्थसंकल्प मांडल्यानंतर मंजूर निधींचा पूर्ण खर्च झाला तरच नवीन निधीची मागणी केली जाईल. विकासकामे योग्य व गुणवत्तेची असावी, असे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर कोणत्याही कंत्राटदाराने हलगर्जीपणा केला किंवा निकृष्ट दर्जाचे काम केले तर कडक कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

तालुक्यातील कार्यालये एकाच ठिकाणी एकत्र करण्यात येणार आहेत, ज्यामुळे नागरिकांना वेळ वाचवता येईल आणि सोईस्कर सेवा मिळेल. पंचायत समिती कार्यालय आणि जुने तहसील कार्यालय एकत्रित केले जाईल तसेच शिवसृष्टी प्रकल्पाची उभारणी करण्यात येईल.

या बैठकीत प्रांत अधिकारी महेश पाटील, डीवायएसपी सविता गर्जे, तहसीलदार महेंद्र वाकलेकर आणि इतर महत्त्वाचे अधिकारी उपस्थित होते.

## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतुकीवरही परिणाम होतो. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वाहनचालकांवर ही कायदेशीर कारवाई केली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस

सर्व १) केशव काळुराम देशमुख २) नंदकुमार काळुराम देशमुख ३) महेश्वर काळुराम देशमुख ४) नरेंद्र काळुराम देशमुख ५) भाविक दत्तात्रेय देशमुख ६) विदया दत्तात्रेय देशमुख, राहणार - गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. महाविर इन्फ्राकॉन तर्फे भागीदार **१. अंकित धनसुखलाल जैन २. अरिहंत रमेश कोठारी ३. देवेंद्र ओस्तवाल ४. वतनकुमार शांतीलाल भगत** यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ३९२६ | १६.१२.२०२४ | पुष्पक | २६ | ८० | ४३०चौ.मी. | २७.०९.२०२४ | २८.१०.२०२४ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(स्वाक्षरी)
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/३७४/२०२४-२५


## माणगावचे हेमंत शेट यांची निवड

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण विशानेमा ज्ञाती मंडळाच्या अध्यक्षपदी माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा नगरपंचायतीचे माजी नगरसेवक हेमंत विष्णुदास शेट यांची इंदापूर येथे समाजाच्या अधिवेशनात एकमताने निवड करण्यात आली.

या मंडळाच्या उपाध्यक्षपदी संगीत दोशी, सेक्रेटरी सपना मेथा, सहसेक्रेटरी गीता मेथा, खजिनदार शाम गांधी, विश्वस्त डॉ. अजय मेहता, अध्यक्ष प्रदीप गांधी, नीता शेट, कार्यकारिणी सदस्य अशी एकूण ३५ जणांची कार्यकारणी एकमताने निवडण्यात आली. या वेळी मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष प्रदीप गांधी, माजी सेक्रेटरी भारत मेथा, विश्वस्त जयाबेन गुजर, विजय मेथा, शांतीलाल मेथा व सर्व कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

या अधिवेशनाला राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी भेट देऊन नूतन अध्यक्ष हेमंत शेट व संपूर्ण कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या.

## इशिका शेलार यांना पुरस्कार

**खालापूर : प्रतिनिधी**

कोरोनामुळे मृत झालेल्या मृतांचे अंत्यविधी करणारी रायगड जिल्ह्यातील पहिली महिला असलेल्या इशिका शेलार यांना पारस काव्य, कला, जनजागृती संस्थेतर्फे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथील प्रसिध्द ताज हॉटेलमध्ये झालेल्या कार्यक्रमात सिनेसृष्टीतील प्रख्यात डायरेक्टर धीरज कुमार यांच्या हस्ते व प्रमुख सन्मानिय व्यक्ती यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील तक्त्यात नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत विदयमान मालक **श्री. धोंडू बारक्या पाटील** व इतर २३ यांचेकडून कायम स्वरूपात खरेदी करण्याचे/घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जाताडे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौमी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. | ८८/१ | ०-५५-६० <br> पो.ख. ०-००-२० <br> **एकुण ०-५५-८०** | ४.६२ |

वर तक्त्यात नमूद शेतजमिन मिळकती त्यात असलेल्या तदंगभूत वस्तूंसह व सर्व हक्कांसह कब्जेदार विदयमान मालक यांचे मालकीच्या व ताबेकब्जातील असून आमचे अशिल आणि विद्यमान मालक यांच्यात आपापसात चर्चा होऊन सदरील शेतजमिन मिळकती खरेदी/विक्री करण्याचे ठरलेले आहे. सदरील शेतजमिन मिळकती निर्वेध, निर्जोखमीची असल्याचा व सदरील मिळकती आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान मालक खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही खरेदी, विक्री, तारण, गहाण, लीज, लीन, दान, पोटगी, कोर्ट जप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदोपत्री पुराव्यासहित लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, अथवा असल्यास त्यांनी तो आमच्या अशिलांचे लाभात सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल विद्यमान मालकांसोबत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक: ३०/१२/२०२४

सही/-
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**

पत्ता - डी/३/१, किनारा हो. सोसायटी, बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६ - मो.नं. ९८२०७९५६०५



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील तक्त्यात नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत विदयमान मालक **श्री. पंढरीनाथ दामा पाटील** व इतर ३ यांचेकडून कायम स्वरूपात खरेदी करण्याचे/घेण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जाताडे, ता. पनवेल, जि. रायगड.**

| अ.क्र. | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौमी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| १. | ९३/२/ब | ०-३५-०० <br> पो.ख. ०-०२-०० <br> **एकूण ०-३७-००** | ३.९४ |

वर तक्त्यात नमूद शेतजमिन मिळकती त्यात असलेल्या तदंगभूत वस्तूंसह व सर्व हक्कांसह कब्जेदार विद्यमान मालक यांचे मालकीच्या व ताबेकब्जातील असून आमचे अशिल आणि विद्यमान मालक यांच्यात आपापसात चर्चा होऊन सदरील शेतजमिन मिळकती खरेदी/विक्री करण्याचे ठरलेले आहे. सदरील शेतजमिन मिळकती निर्वेध, निर्जोखमीची असल्याचा व सदरील मिळकती आमचे अशिलांना विकण्याचा हक्क व अधिकार विद्यमान मालकांना असल्याचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांबरोबर सदर विद्यमान मालक खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

तरी सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही खरेदी, विक्री, तारण, गहाण, लीज, लीन, दान, पोटगी, कोर्ट जप्ती, बक्षीस, वहिवाट अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदोपत्री पुराव्यासहित लेखी कळवावे. तशी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास सदर शेतजमिन मिळकतींवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, अथवा असल्यास त्यांनी तो आमच्या अशिलांचे लाभात सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल विद्यमान मालकांसोबत खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दिनांक: ३०/१२/२०२४

सही/-
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**

पत्ता - डी/३/१, किनारा हो. सोसायटी, बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६ - मो.नं. ९८२०७९५६०५



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे अशील हे कायम खरेदीखत करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **श्री. हासुराम मारूती पाटील** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे जाताडे तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| जाताडे | ९३/२/अ | ०-३६-५० <br> पो.ख. ०-०४-७० <br> **एकुण ०-४१-२०** | ४.०० |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल ३०/१२/२०२४

सही/-
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**

पत्ता - डी/३/१, किनारा हो. सोसायटी, बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६ - मो.नं. ९८२०७९५६०५



**पनवेल महानगरपालिका, पनवेल ४१० २०६**
**जाहीर नोटीस**

**सर्व संबंधितांना या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत मौजे - बीड या महसूली गावाच्या सर्व्हे नं. ५४ पासून ते सर्व्हे नं. ६१ पर्यंतच्या ३०.०० मी. रुंदीच्या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २०५, २०६, २०७ व २०९ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या विकास योजना रस्त्याने बाधीत तसेच ना-बांधिव क्षेत्र पनवेल महानगरपालिका सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांकडून हस्तांतरणीय विकास हक्काच्या (टी.डी.आर) बदल्यात ताब्यात घेत आहे. सदरील मिळकत निर्वेध व निजाखीम असल्याचा भरवसा सदर मिळकतीच्या हितसंबंधीतांनी पनवेल महानगरपालिकेस दिला आहे.**

**खालील नमूद मिळकतीवर खालीलप्रमाणे जमीन मालकांशिवाय अन्य कोणाचाही अन्न, वस्त्र, गहाण, दान, बक्षीस, खरेदी, पोटगी, लीज, लीन, चार्ज, इजमेंट अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास संबंधितांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सहाय्यक संचालक, नगररचना, पनवेल महानगरपालिका पनवेल ४१० २०६ यांच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी व वेळेत येऊन मुळ कागदपत्रांसह आपली हरकत लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत कोणचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास खालील मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क वा हितसंबंध नाही असे समजून किंवा असल्यास संबंधिताने तो जाणूनबुजून सोडून दिला आहे, असे समजून पनवेल महानगरपालिका जमीन ताब्यात घेईल व सदर जमिनीचा मोबदला टी.डी.आर च्या स्वरूपात खालील जमीनमालकास अदा केला जाईल, त्यानंतर येणाऱ्या कोणत्याही तक्रारींची दखल घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

**परिशिष्ट १) मिळकतीचे वर्णनः मौजे -बीड, ता. पनवेल येथील मे. मेट्रोसत्यम बिल्डर्स एल.एल.पी. यांचे मालकीच्या जमीन मिळकतीमधील प्रस्तावित ३०.०० मी. रुंदीच्या विकास योजना रस्त्याने बाधीत तसेच ना- बांधिव क्षेत्र पुढीलप्रमाणे :-**

**१) मौजे - बीड, सर्व्हे नं. ५४/१२, क्षेत्र २५००.०० चौ. मी. त्यापैकी रस्त्यासाठी बाधीत व ना-बांधिव क्षेत्र २४९९.९३८ चौ. मी.**

**त्यास मोजणी नकाशानुसार चतुःसीमा खालीलप्रमाणे -**
**पुर्वेस : सर्व्हे नं. ५१/४, पमपा डी.पी. रस्ता, बीड**
**पश्चिमेस : सर्व्हे नं. ५४/५, पमपा डी.पी. रस्ता, बीड**
**दक्षिणेस : लागू पालीची शिव**
**उत्तरेस : सर्व्हे नं. ५३/० बीड**

**टिप : उक्त जागा दर्शविणारा नकाशा पाहणीसाठी नगररचना विभागात ठेवण्यात आला आहे.**

**सहाय्यक संचालक नगररचना**
**पनवेल महानगरपालिका,**

**जा क्र. -**
**पमपा/नरवि/टिडीआर/२६-२४/२९३२/२०२४** **दिनांक : २४/१२/२०२४**

**टिप - सदरची जाहीर नोटीस पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.**



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग पिन कोड - ४०२ २०१**
ई-मेल पत्ता :- alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :- (०२१४१)२२२०८४/२२५०९६

## ई-निविदा सूचना क्र. ३७ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रुपये |
|---|---|---|
| १. | सावरोली खारपाडा रस्ता रा.मा. १०४ कि.मी. २६ / ३२५ मध्ये मोरीची पुरहानी दुरुस्ती करणे ता. पेण जि. रायगड | २८,३०,९३५/- |
| २ | सावरोली खारपाडा रस्ता रा.मा. १०४ कि.मी. २७/८०० मध्ये मोरीची पुरहानी दुरुस्ती करणे ता. पेण जि. रायगड | २५,७७,६३१/- |
| ३ | जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील इमारतीचे विस्तारीकरण करणे ता. अलिबाग जि. रायगड (Rennovation of OPD Building at Civil Hospital Premises) | ३२,१६,८६५/- |
| ४ | जिल्हा रुग्णालय अलिबाग येथील इमारतीचे नुतनीकरण करणे ता. अलिबाग जि. रायगड (Extension of C.S Chamber C.S. Office) | ४०,५०,७२०/- |
| ५ | फल्याण वावे जांभूळपाडा नवघर ठाणाले एरल जामगांव प्रजिमा ३८ जांभूळपाडा गाव कि.मी. ७/८०० ते ८/५०० मध्ये गटरचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ३५,७५,०२३/- |
| ६ | उसर फाटा ते नांद्रुकी रस्त्याचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ८२,६४,८६४/- |
| ७ | गावठेवाडी ते भपक्याचीवाडी रस्त्याचे बांधकाम करणे ता. सुधागड जि. रायगड | ६५,४९,८५२/- |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी** : (अ.क्र. १ ते ५) दिनांक ३१.१२.२०२४ (स.१०.००) ते दिनांक १४.०१.२०२५ (सं.१८.००)
(अ.क्र. ६ ते ७ दिनांक ३१.१२.२०२४ (स.१०.००) ते दिनांक २४.०१.२०२५ (सं.१८.००)
**ई-निविदा उघडणे** : (अ.क्र. १ ते ५) दिनांक १७.०१.२०२५ (दु. ३.०० वा.)
(अ.क्र. ६ ते ७) दिनांक २७.०१.२०२५ (दु. ३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई- निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. http://mahapwd.com २. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल. )
३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./ सा.बां./अवि/निविदा/६५४१/२०२४
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- २४/१२/२०२४

सही/-
**(ज. ई. सुखदेवे)**
कार्यकारी अभियंता,
सा. बां. विभाग, अलिबाग, जि.रायगड



**ग्रामपंचायत हाळखुर्द**
**ता. खालापूर, जि. रायगड**

## जाहीर निविदा

ग्रामपंचायत हाळखुर्द हद्दीतील मौजे हाळखुर्द येथिल मा. गटविकास अधिकारी साहेब यांनी मंजुर केलेल्या अंदाजपत्रकानुसार मासिक सभा दि. २८/११/२०२४ रोजी घेण्यात आली. ठराव क. १३/१३५ अन्वये त्या अंदाजपत्रकानुसार ग्रामपंचायत फंड व १५ वा वित्त आयोग फंड अंतर्गत आवश्यक असणाऱ्या कामांची निविदा मागविण्यात येत असून इच्छुक पुरवठादारांकडुन सिलबंद निविदा दिनांक ०२/०१/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत हाळखुर्द कार्यालयात समक्ष अथवा पोष्टाने पाठवाव्यात. निविदा दि. ०३/०१/२०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सरपंच ग्रामपंचायत हाळखुर्द यांनी राखून ठेवला आहे. ती कामे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | वर्ष | इसारा रक्कम | योजनेचे नाव | कामपुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हाळखुर्द हद्दीतील हाळ का. वाडी अंतर्गत नळ पाईप टाकणे व दुरुस्त करणे. | ११४५३२ | २०२४-२५ | १ टक्के | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | २ महिने |
| २ | अंगणवाडीस लागणारे साहित्य पुरविणे. | ६२२८७ | २०२४-२५ | १ टक्के | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | २ महिने |
| ३ | शाळा डिजीटल करणे. (ग्रा.प. हाळखुर्द हद्दीतील शाळांना ई लर्निंग सेट देणे.) | १३०००० | २०२४-२५ | १ टक्के | १५ वा वित्त आयोग (अबंधित) | २ महिने |

**अटी व शर्ती :**
१. सदरचे काम एमएसईबीचे तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करण्याचे आहे. सदर निविदाबाबत विस्तृत माहिती ग्रामपंचायत कार्यालयात हाळखुर्द येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.
२. काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या मुल्यांकन बिलातून ५ टक्के सुरक्षा अनामत २ टक्के विक्रीकर, २ टक्के आयकर, १ टक्का मजुर विमा कामगार कल्याण सेस इत्यादी रकमा कपात केली जाईल.
३. कामाचे वेळी काही जिवितहानी झाल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.
४. काम सुरु करण्यापुर्वीचे फोटो काम सुरु असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
५. पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.
६. स्थानिक ठेकेदारांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.
७. जीएसटी धारकांचेच अर्ज स्विकारले जातील.

दि. ३१/१२/२०२४

सही/-
**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत हाळखुर्द
ता. खालापूर जि. रायगड

# सायन-पनवेल महामार्गावर डीप क्लिनिंग



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ नवी मुंबई शहर सर्व दृष्टीने स्वच्छ असावे याकरिता दररोजच्या नियमित स्वच्छतेप्रमाणेच शनिवार व रविवार या सार्वजनिक सुट्ट्यांच्या दिवशी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घनकचरा व्यवस्थापन विभाग व स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या वतीने दुर्लक्षित व पडीक जागांची तसेच महानगरपालिकेच्या अखत्यारीत नसलेल्या सायन पनवेल महामार्गावर सखोल स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पदपथांच्या कडेला घट्ट झालेली माती तसेच झाडांच्या अस्ताव्यस्त वाढलेल्या फांद्या आणि पालापाचोळा यांची बारकाईने स्वच्छता करण्यात आली.

नेरूळ येथील एलपी जंक्शनपासून



नेरूळ रेल्वे स्टेशन आणि नेरूळ रेल्वे स्टेशन ते हावरे जंक्शन तसेच हावरे जंक्शन ते अपोलो जंक्शन अशा सर्व बाजूंच्या मुख्य रस्त्यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे सायन पनवेल हायवेवरही साफसफाई करण्यात आली.

विशेष म्हणजे पालापाचोळा व कचरा उचलून झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अत्याधुनिक फॉगर्स मशीनद्वारे स्वच्छ केलेले पदपथ, रस्ते आणि दुर्लक्षित जागा पाणी मारून स्वच्छ करण्यात आल्या. महत्त्वाचे म्हणजे यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या मलप्रक्रिया केंद्रातून शुद्ध केलेल्या प्रक्रियाकृत पाण्याचा वापर करण्यात आला. अशाप्रकारे फॉगर्स वाहनाद्वारे रस्ते सफाई केल्याने हवेतील धुळीचे प्रमाण कमी होऊन प्रदूषणही कमी होणार आहे. अशाच प्रकारची सखोल स्वच्छता मोहीम तुर्भे विभाग कार्यालय परिसरातही राबविण्यात आली.

नियमित स्वच्छतेप्रमाणेच अशा प्रकारच्या डीप क्लिनिंग मोहिमा राबवून नवी मुंबई परिसरातील सर्वांगीण स्वच्छतेकडे बारकाईने लक्ष दिले जात आहे.

## निवडक

### नेरूळमध्ये आधार कार्ड शिबिर

**नवी मुंबई :** शिवसेनेच्या वतीने नेरूळ येथील शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालयात दोन दिवसीय आधार



कार्ड शिबिर झाले. शिबिर माजी उपमहापौर अशोक गावडे व माजी नगरसेविका सपना गावडे यांच्या पुढाकारणे आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ २०० हून अधिक गरजू नागरिकांनी घेतला. या शिबिरात नवीन आधार कार्ड नोंदणी व आधार दुरूस्ती, नवीन आधार कार्ड बनविणे, बायोमेट्रिकस अपडेट करणे, मोबाईल नंबर अपडेट करणे व नवीन मोबाईल नंबर लिंक करणे तसेच नाव, जन्मतारीख, पत्ता अपडेट करणे आदी कामे करण्यात आल्याचे आयोजक सपना गावडे यांनी सांगितले.

### दत्तात्रेय म्हात्रे यांना पुरस्कार

**उरण :** तालुक्यातील चिरनेर येथील पत्रकार दत्तात्रेय



अनंत म्हात्रे यांना शनिवारी (दि.२८) रोजी नवी मुंबई येथील पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या यंदाच्या राज्यस्तरीय पत्रकारभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचा पत्रकारितेतील हा प्रवास सतत प्रवाहित राहावा, अशा अभिनंदनपूर्वक शुभेच्छा उद्योगपती राजेंद्र खारपाटील, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, मंगेश चांदिवडे, पुंडलिक म्हात्रे, मधुकर ठाकूर, प्रदीप पाटील, जगदीश तांडेल, दिनेश पवार, वसंत चिर्ले कर, प्रमोद पाटील, विजय पाटील, धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, आनंद चिर्लेकर, अशोक म्हात्रे, कृष्णकांत म्हात्रे, संतोष ठाकूर, वैशाली मोहिते, परेशा सरोदे, रूचिता म्हात्रे, के.बी. ठाकूर, अस्मित ठाकूर, गोवर्धन पाटील, संदेश चौलकर यांनी अभिनंदन केले.

### राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा

**उरण :** सानपाडा, नवी मुंबई येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर



सभागृह येथे पारस काव्या कला जनजागृती संस्थेच्या १४व्या वर्धापन दिनानिमित्ताने विविध क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्यांना महाराष्ट्रातील १०८ युवा युवतीना २०२४ राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये नेहा विशाल पाटील (मु.बोरखर) हिला क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्यामुळे क्रीडारत्न पुरस्कार देण्यात आला. हर्षद वसंत पाटील वावंजे पनवेल यांना क्रीडा क्षेत्रातील चांगली विद्यार्थी घडविल्या मुळे त्यांना क्रीडा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. गोपाळ दिनकर म्हात्रे सारडे उरण यांना आदर्श शिक्षक राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार देण्यासाठी मंगेश चांदिवडे, शोभा चांदीवडे, दामोदर बेडेकर, सुरेश शेंडेकर, पुंडलिक म्हात्रे, संजय बर्वे, शंकर गोपाली आदी उपस्थित होते.

### ज्येष्ठ व आदिवासींना ब्लँकेट वाटप



**मोहोपाडा :** भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबळ ट्रस्ट, मुंबई यांच्या वतीने ठिकठिकाणी ज्येष्ठ नागरिक व अदिवासी बांधवांना उबदार ब्लॅकेटचे वाटप करण्यात आले. या वेळी मोहोपाडा, कोटवलवाडी, गोरेवाडी, धामसेवाडी, विठ्ठलवाडी, भोमलवाडी, चिंचवाडी, खांडस, नांदगाव आदी परिसरातील ज्येष्ठ नागरिक व आदिवासी बांधवाना भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबळ ट्रस्टच्या ट्रस्टी शैलेश शाह, रांजन शाह, धवल सावळा यांच्यावतीने वाटप करण्यात आले. राकेश चव्हाण, बाळू खाडे, प्रेम आयंगर आदी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिक व आदीवासी बांधवांना ऐन थंडीच्या दिवसांत उबदार ब्लॅकेट मिळाल्याने त्यांनी भारतीबेन रमणिकलाल शाह चॅरिटेबल ट्रस्टचे आभार मानले.

## भवानी फाऊंडेशनचा वर्धापन दिन सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भवानी फाऊंडेशनचा ९वा वार्षिक वर्धापनदिन सोहळा जुईनगर येथील बंट्स सभागृहात मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास अयोध्या राममंदिरचे ट्रस्टी श्री श्री विश्वप्रसन्न तीर्थ स्वामी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

या वेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे माजी सचिव पी.व्ही. शेट्टी, सिडकोचे मुख्य नियंत्रक डॉ. जगन्नाथ वीरकर, मुंबई बंट्स असोसिएशनचे अध्यक्ष सीए सुरेंद्र शेट्टी, अश्वित ग्रुप ऑफ हॉटेल्सचे सीएमडी संजीव शेट्टी आदी उपस्थित मान्यवरांचा या कार्यक्रमात विशेष सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर सीताराम शेट्टी, द्रष्या शेट्टी, तेजाक्षी शेट्टी, जिविका विश्वनाथ शेट्टी यांचादेखील सन्मान करण्यात आला.

या वेळी शालेय मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर विशेष कार्यक्रम सादर केला. भवानी फाउंडेशनच्या कर्मचाऱ्यांनीही विशेष सादरीकरण केले. सर्व मान्यवरांचा स्वागत, सत्कार



भवानी ग्रुपचे संस्थापक के.डी. शेट्टी व व्यवस्थापकीय संस्थापक जिक्षित शेट्टी यांनी केला. भवानी फाउंडेशन ट्रस्टचे ट्रस्टी जिक्षित शेट्टी, धर्मपाल देवडिगा, नवीनचंद्र सनील, रवी उचील, रंजना केणी तसेच फाऊंडेशनचे उपाध्यक्ष दिनेश शेट्टी, सचिव शिखा शेट्टी, सहसचिव राजलक्ष्मी आळते, खजिनदार करनूर मोहन राय, सहखजिनदार नवीन शेट्टी यांच्या विशेष सहकार्याने सोहळा झाला.

या वेळी उपस्थित प्रमुख अतिथी विश्वप्रसन्न तीर्थ स्वामी यांनी समाजाचं आपण देणं लागतो आणि ते देणं आपण दिलं पाहिजे. के.डी. शेट्टी भवानी फाऊंडेशनद्वारे वैद्यकीय, शैक्षणिक, आरोग्य आणि विधवा भगिनींकरता मदत या क्षेत्रात समाजकार्य करून इतरांसाठी आदर्श निर्माण करत आहेत असे आपल्या भाषणात सांगितले. के.डी. शेट्टी यांनी भवानी फाउंडेशनच्या ९ वर्षांच्या प्रवासाचा उलगडा केला. कार्यक्रमास मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

## सरत्या वर्षाला निरोप अन् नववर्ष स्वागताची तयारी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नवी मुंबईकर सज्ञ झाले आहेत. नवीन वर्षाच्या स्वागताची तयारी सर्वत्र दणक्यात सुरू असून शहरातील महत्त्वाच्या अशा शासकिय इमारतींना आकर्षक विद्युत रोषणाईने सजविले आहे.

हॉटेल, बार-रेस्टॉरंट्स, धाबे देखील विद्युत रोषणाईच्या लख्ख प्रकाशने उजळून निघाले आहेत. तसेच खवय्यांना विविध पदार्थांचे मेजवानी चाखायला मिळणार आहे. यासाठीचे नियोजन आत्तापासूनच सुरू असून एखाद्या उत्सवाप्रमाणे नवीन वर्षाच्या स्वागताचा जल्लोष चालणार आहे. यंदा पहाटे पाच पर्यंत जल्लोषा साठी मुभा असल्याने यंदाचा नवं वर्षाचा स्वागत दणक्यात होणार असल्याची चर्चा सध्या रंगली आहे.

यावर्षी नववर्ष स्वागताचा नागरिकांचा उत्साह लक्षात घेता शहरातील हॉटेल चालकांकडून चोख नियोजन केले जात आहे. अनेक ठिकाणी पार्ट्यांचे नियोजन केले जात असून संगीत, लज्ञतदार पदार्थ तसेच विविध शीतपेये चाखण्याची संधी मिळणार आहे. याच सोबत गावरान जेवणाच्या मांसाहारातील मेणूना देखील चांगलीच मागणी वाढली आहे, तर हॉटेलमध्ये विशेष मेन्यू तयार करण्यात आला आहे. यामध्ये चमचमीत, तिखट खाद्यपदार्थ यांच्यासह गोडधोड पदार्थांची मेजवाणी खवय्यांसाठी असणार आहे. नेहमीप्रमाणे यंदाही हॉटेल्स, रिसॉर्ट, फार्महाऊसमध्ये पार्ट्यांसाठी पहाटे पाचपर्यंत परवानगी देण्यात आली आहे.

तांदळाच्या भाकरी सोबत ज्वारी, बाजरीच्या भाकरी, आगरी चिकन मटणाला पसंती मिळत आहे. नववर्षाचे स्वागत करताना मंगळवार असल्याने खवय्यांनी मांसाहाराचे बेत आखले आहेत. तर काहींनी व्हेज जेवणाच्या मेनुसह गोडाधोडा च्या पदर्था ची मागणी वाढली आहे. घरगुती जेवणाला मागणी असल्यानं मोठ्या प्रमाणात ऑर्डर देण्यात आल्या आहेत.

चिकनाबरोबरच मटणाच्या दुकानासमोर चांगलीच रांग दिसणार आहे. ताज्या मासळीचे भाव देखील वधारले आहेत.



## उरण सामाजिक संस्थेला राज्यस्तरीय पुरस्कार

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

टी.एम.जी क्रिएशन आणि एनोवेटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्या सयुंक्त विद्यमाने ललकारी सन्मानाची अनुभूती महागौरव संमेलनाचे आयोजन मराठी पत्रकार संघ मुंबई येथे करण्यात आले होते. या वेळी रायगड जिल्ह्यातील उरण सामाजिक संस्थेच्या कार्याचा गौरव करत पुरस्कार प्रदान करण्यात आला.

उरण सामाजिक संस्थेकडून संतोष पवार, काशिनाथ गायकवाड, प्रा.राजेंद्र मढवी, रुपेश पाटील, वैभव पाटील यांनी कर्नल रविंद्र त्रिपाठी, ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे, अभिनेता अभंष कुमार यांच्या हस्ते हा बहुमोल पुरस्कार स्वीकारला.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या मुंबई येथील सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमासाठी निवृत्त कर्नल रवींद्र त्रिपाठी, ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे, बॉलिवूड अभिनेते अभंष कुमार, स्त्रीरोगतज्ञ डॉ. शुभदा नील, अल्ताफ शेख प्रमुख अतिथी होते. या सर्वांच्या हस्ते पुरस्कर्त्यांचा सन्मान करण्यात आला. तत्पूर्वी सांस्कृतिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी पुरस्कार देताना आयोजकांनी उरण सामाजिक संस्थेची उपस्थितांना ओळख सांगत संस्थेच्या आरोग्य, शिक्षण, पर्यावरण क्षेत्रातील आजवरच्या कार्याचा गौरव केला.

## कारची स्कूटीला धडक

### तरुणाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भिंगारी गाव येथील पनवेलकडे येणाऱ्या सर्विस रोडवर महावितरणच्या कार्यालयाजवळ भरधाव वेगाने आलेल्या कारने इलेक्ट्रिक स्कुटीला दिलेल्या धडकेत दोघेजण जखमी झाले होते. यातील सुशील दत्ताराम पवार याचा २७ डिसेंबर रोजी मृत्यू झाला. या अपघाता प्रकरणी किया कार (एमएच ०५ ईए ५१९३) वरील चालकाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सचिन कोनकर (रा. काळुंद्रे गाव) हा आणि त्याचा मित्र सुशील पवार (वय २८) हे काळुंद्रे गाव येथून २५ डिसेंबर रोजी पनवेल येथे मित्राच्या घरी कामानिमित्त इलेक्ट्रिक स्कूटी (एमएच ४६ सीजे १८१७) वरून रात्री पावणे बाराच्या सुमारास जात होते. भिंगारी गाव येथील पनवेलकडे येणाऱ्या सर्विस रोडवर महावितरण कार्यालयाजवळ आले असता समोरून येणाऱ्या किया कार (एमएच ०५ इए ५१९३) या कारवरील चालकाने भरधाव वेगाने येऊन स्कुटीला जोरदार धडक दिली. या अपघातात सचिन याच्या




हाताच्या खांद्याला व उजव्या पायाच्या मांडीला दुखापत झाली तर सुशील पवार हा जखमी झाला. त्यांना उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, कामोठे येथे दाखल करण्यात आले. या अपघातात सुशील पवार याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## खारघर येथे नऊ बांगलादेशी ताब्यात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पेठ पाडा गाव, सेक्टर ३३, खारघर येथून नऊ बांगलादेशींना दहशतवाद विरोधी पथक, नवी मुंबई यांनी ताब्यात घेतले. त्यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

२७ डिसेंबर रोजी दहशतवाद विरोधी पथक नवी मुंबई यांना सेक्टर ३३, खारघर पेठपाडा गाव या ठिकाणी बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस त्या ठिकाणी रवाना झाले.

या वेळी इसानुर अल्लाउद्दीन शेख, त्याची पत्नी सबीना इसानूर शेख त्यांचा दीड वर्षाचा मुलगा, मिराज एपीअमुल्ला मुल्ला, त्याची पत्नी सबीहा मिराज मुल्ला तसेच त्यांचा अडीच वर्षाचा मुलगा, मोहम्मद हफिजूर मंजूर सिकदर, त्याची पत्नी खादीजा मोहम्मद हफिजूर सिकदर, तिची दोन वर्षाची मुलगी तसेच त्याची सासू राझीया असा दुल मुल्ला, उबेदउल्ला हबीशेख, त्याची पत्नी मोईना उबेदउल्ला शेख, त्यांची सहा वर्षीय आणि चार वर्षीय मुले यांच्याकडे भारतीय कागदपत्रांची मागणी केली असता कोणतेही कागदपत्रे मिळून आले नाहीत.

## पिल्लई महाविद्यालयात रंगला माजी विद्यार्थ्यांचा मेळावा



**पनवेल : वार्ताहर**

पिल्लई अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीई), नवीन पनवेलचे '२५ गौरवशाली वर्षे' (१९९९-२०२४), आणि जगभरातील १५०० हून अधिक माजी विद्यार्थ्यांसह रौप्य महोत्सवी माजी विद्यार्थी मेगा मेळावा २१ डिसेंबर २०२४ रोजी साजरा करण्यात आला.

उद्घाटन समारंभात दूरदर्शी नेते डॉ. के. एम. वासुदेवन पिल्लई, शिक्षणतज्ञ, अध्यक्ष, सीईओ आणि संस्थापक महात्मा एज्युकेशन सोसायटी (एमईएस) आणि डॉ. डॅफ्नी पिल्लई, सचिव आणि संस्थापक एमईएस, डॉ प्रियम पिल्लई सीओओ एमईएस, आणि फ्रनव पिल्लई, मुख्य विपणन आणि ब्रँडिंग अधिकारी एमईएस, प्राचार्य डॉ संदीप जोशी, पीआयएमएसआरचे संचालक डॉ चंद्रन आणि विभाग प्रमुखांच्या हस्ते दीपप्रज्वलन व केक कापण्यात आले.

प्राचार्यांनी संस्था आणि संशोधन आणि विकास आणि संस्थापकांच्या मार्गदर्शनातून मेकरथॉन, कोडर ऑफ द इयर, इनोव्हेशन आणि उद्योजकता इत्यादी सारख्या इतर उपक्रमांची माहिती देऊन पीसीईच्या अत्यंत चित्तवेधक आणि महत्त्वाच्या राष्ट्रासेवेचा उल्लेख कारताना ३ आणि ४ ऑक्टोबर २०२५ रोजी होणार्या पीसीईच्या फ्लॅगशिप द्विवार्षिक भविष्यातील शहरांसाठी तंत्रज्ञानावरील परिषद - कॉन्फरन्स फॉर फ्युचर सिटीजमध्ये माजी विद्यार्थी, वर्तमान विद्यार्थी आणि प्राध्यापकवृंद या सर्वांना आमंत्रित केले आहे.

माजी विद्यार्थ्यांचा मेगा मीट हा केवळ पुनर्मिलनच आणि स्नेहसम्मेलन नव्हते तर पिल्लईंच्या वारशात मैत्री, तळमळ आणि अभिमान वाटून साजरा केला जाणारा एक उत्सवही होता. १२ बॅनर्सचे अनावरण करून कॉलेजचा प्रवास आणि त्यातील विविध यशांची आकर्षक आतषबाजी करण्यात आली.

## प्रांजल पाटील संगीतरत्न पुरस्काराने सन्मानित

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठेभोम गावातील श्री महागणपती रिक्षा चालक युनियनचे सदस्य हरेश रामचंद्र पाटील यांची इयत्ता दहावी शिकणारी कन्या गायिका प्रांजल हरेश पाटील ही पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय संगीतरत्न पुरस्कार २०२४ ची. मानकरी ठरली असून, तिला हा मानाचा पुरस्कार शनिवार (दि. २८) डिसेंबर रोजी



नवी मुंबई येथील बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

घराण्याला कोणतीही गायनाची परंपरा नसताना देखील, गायनाचा छंद जोपासणाऱ्या प्रांजल पाटील हिने आजपर्यंत ३० पेक्षा जास्त गाण्यांचे रेकॉर्डिंग पूर्ण केलेले आहेत. हळदीच्या कार्यक्रमाबरोबर गौरी-गणपती, नवरात्र उत्सव अशा विविध कार्यक्रमातून तिचे गायनाचे कार्यक्रम सुरू आहेत. भजनाची आवड असल्यामुळे सध्या ती शास्त्रीय गायनाचे धडे घेत आहेत. दरम्यान सध्या दि.बा. पाटलांच्या जीवनावरील तिचे गाणे रायगड जिल्ह्यात गाजत असून, भविष्यात यशस्वी गायिका म्हणून ती निश्चित नावारूपाला येईल, असा विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदिवडे व जागतिक कीर्तीचे कवी पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

# माथेरानमध्ये ई-रिक्षाची संख्या वाढवा

## 'थर्टीफर्स्ट'साठी पर्यटकांची मागणी

**नेरळ : प्रतिनिधी**

थर्टीफर्स्टसाठी माथेरानमध्ये ई-रिक्षाची तातडीने संख्या वाढवावी, अशी मागणी येथे येणाऱ्या पर्यटकांनी केली आहे.

नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी माथेरानला पसंती दिली असून शनिवारपासून माथेरान येथे पर्यटकांचा लोंढा जमा होत आहे, परंतु आलेल्या पर्यटकांना वाहतुकीच्या गहन समस्यांना समोरे जावे लागत असून आपल्या कुटुंबासोबत आणलेल्या सामानाचे ओझे हातात घेवून शहरात जात असताना त्रेधातिरपीट उडत आहे.

माथेरान दस्तुरी नाका ते माथेरान शहर यामधील अंतर तीन किलोमीटर आहे. येथे कुठलेही वाहन जात नसून घोडे आणि माथेरान मिनी ट्रेनच्या सेटल सेवा सुरू आहे आणि पर्यावरण पूरक ई रिक्षा सुरू झालेली आहे, परंतू घोडे सवरी पर्यटकाना परवडणारी नसून, शटल सेवा काही वेळेच्या अंतरावर असल्याने ई रिक्षा हा पर्याय सोपा आहे, परंतु ई रिक्षा अपुऱ्या पडत असल्याने पर्यटकांनी ई रिक्षा वाढवण्याची मागणी केली.

ई रिक्षाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे कधी नव्हे एवढी पर्यटकांची गर्दी माथेरान या पर्यटनस्थळी यंदाच्या वर्षी पाहावयास मिळत आहे.त्यातच थर्टी फर्स्ट डिसेंबर जवळ आल्याने येथे पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळत आहे. पर्यटकांना वाहनाने दस्तूरी नाका येथे उतरावे लागते. दस्तुरी नाका येथील ई रिक्षाच्या स्टँडवर अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रहदारीला कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण न करता कोणत्याही बंदोबस्ताशिवाय ई रिक्षा संघटना उत्तम प्रकारे सेवा देत आहेत. विशेष म्हणजे या ई रिक्षाच्या स्वस्त आणि सुरक्षित सेवेचा लाभ घेण्यासाठी पर्यटक सुध्दा आपला अमूल्य वेळ खर्च करून ताटकळत उभे राहून चांगल्या पद्धतीने प्रतिसाद देत आहेत. या सेवेचा पायलट प्रोजेक्ट पूर्ण झाला असून फक्त वीस रिक्षांच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून देणे चालकांना त्रासदायक बनले आहे. संघटनेची त्यांच्या हक्काची उर्वरीत एकूण ७४ बाकी असलेल्या ई रिक्षांची मागणी आहे.

या सर्व रिक्षा उपलब्ध झाल्यास सर्वाना प्रवास सुखकर होणार असून यापुढेही इथे मोठया प्रमाणावर पर्यटन क्रांती घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. शासनाने आणि संबंधित समितीच्या अधिकाऱ्यांनी लवकरच ई रिक्षांच्या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे.शाळेच्या दिवसात शालेय विद्यार्थ्यांना वीस पैकी पंधरा रिक्षा सेवा देत असतात तर उर्वरित पाच रिक्षा प्रवाशांना अपुऱ्या पडतात. मुख्य म्हणजे ई रिक्षाला ज्या लोकांचा आजही विरोध कायम आहे तीच मंडळी प्रामुख्याने या सेवेचा लाभ घेत आपल्या कुटुंबातील सदस्यांना लाभ घेण्यास सांगत आहेत.



**आमच्यासाठी ई रिक्षांची सुविधा उपलब्ध केली आहे ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. पण इथे एवढे पर्यटक येत असतात तर वीस रिक्षा खूपच कमी आहेत. प्रशासनाने या ठिकाणी अजून काही रिक्षांना प्राधान्य दिले तर आमचा वेळ वाचेल आणि इथे पर्यटक जास्त प्रमाणात येतील त्यामुळे इथल्या गोरगरिबांना रोजगार मिळेल.**
**-निरंजन हातनोलकर, पर्यटक, मुंबई**

**गर्दीच्या वेळी पर्यटकांना ई रिक्षाच्या रांगेचे नियोजन मी निस्वार्थीपणे करीत असतो. ई रिक्षाची संख्या कमी असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिलांना तासनतास ई रिक्षाची वाट पहावी लागते यासाठी सनियंत्रण समितीने ई रिक्षाची संख्या वाढवावी. पायलट प्रोजेक्टचा कालावधी पूर्ण झाला आहे.**
**-जनार्दन पार्टे, सामाजिक कार्यकर्ते, माथेरान**

# रोह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटीबद्ध -खासदार सुनील तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा व विधानसभा निवडणुका संपल्यानंतर खासदार सुनील तटकरे क्शन मोडमध्ये आल्याचे दिसून येत आहेत. रोहा तालुक्यातील विविध कामांची पाहणी करत असताना खासदार तटकरे यांनी रोहा शहरात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण बैठक रोहा नगर परिषद कार्यालयात घेतली.

रोहा शहर कात टाकणार असून या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी व खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या रोहा शहरातील विविध कामांचा आढावा खासदार तटकरे यांनी घेतला. रोहा शहरातील नवरत्न हॉटेल, दमखाडी, सागर डेअरी, नगरपालिका चौक, तीन बत्ती नाका, अष्टमी कडे जाणार रस्ता जुना मच्छी मार्केट, हॉटेल प्राईड, मेहेंदळे हायस्कूल समोरील चौक, संजय गांधी रुग्णालय समोरील चौक, मोरे आळी, राम मारुती चौक, अष्टमी नाका, धनगर आळी चौक यासह शहरातील अन्य चौक सुशोभीकरण करण्यात येणार आहे. रोहा शहरातील नवरत्न हॉटेल ते तहसील कार्यालयापर्यंत डिव्हायडर लावण्याच्या सूचना यावेळी नागरिकांनी दिल्या. त्या संबंधित कारवाई करण्यात येणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूने दिवे लावण्यात येणार असून शहरात महत्त्वाच्या ठिकाणी हायमॅक्स दिवे बसवण्यात येणार आहेत. शहरातील शाळा आत्याधुनिक सुविधायुक्त होणार आहेत. डिजिटल बोर्ड सह अन्य सुविधा या शाळांना देण्यात येणार आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या संकल्पनेतून साकार होणाऱ्या शहरातील विविध प्रकल्पांची या सर्व संबंधित विषयी अधिकारी वर्गांनी या वेळी माहिती खासदार सुनील तटकरे यांना दिली. या वेळी प्रत्यक्ष सादरीकरण विविध संस्थेकडून करण्यात आले.



खासदार सुनील तटकरे यांनी रोहाचा विकास नियोजनबद्ध होत असून विकासासाठी आता नागरिकांनीही सहकार्य करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. रोहा शहराचा विकास होत असताना शहरातील नगर परिषदेच्या जागेवर असलेल्या अतिक्रमण विकासाला बाधा येत असेल तर ते हटवण्यात येणार आहेत. घरपट्टी संदर्भात नियमात असेल तीच घरपट्टी देण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी अजय एडके यांनी सांगितले.

या बैठकीला राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे भाजप शहराध्यक्ष यज्ञेश भांड, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, स्नेहा आंब्रे, नितीन पिंपळे, मयूर पायगुडे, निलेश शिर्के, अजित मोरे, ठेकेदार रुपेश पाटील, विनीत वाकडे, अशोक धोत्रे, रोहा नगरपरिषदेचे ओंकार भुरण, रवी चाळके, नितीन कोलटकर आदी सह रोहा नगर परिषद, विद्युत मंडळ, एस टी महामंडळ, सार्वजनिक बांधकाम, भूमी अभिलेख, महसूल अधिकारी कर्मचारी यासह शहराचा संबंधित अधिकारीसह रोहेकर नागरिक उपस्थित होते.

# रोहा प्रेस क्लबतर्फे पुरस्कार वितरण

## ना. आदिती तटकरे यांची उपस्थिती

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा प्रेस क्लबच्या वतीने प्रेस क्लब सन्मान २०२४ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांची उपस्थिती लाभली.

रोहा प्रेस क्लब आयोजित ज्येष्ठ नागरिक सभागृहात ऋषितुल्य उद्योगपती मुकुंदभाई तुराकीया यांसह शिक्षण, उद्योजक, वैद्यकीय कामगार, स्वच्छ व सुरक्षित कंपनी गौरव पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. अध्यक्षस्थानी अ भा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर होते. व्यासपीठावर उद्योगपती मुकुंदभाई तुराकीया, प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरीवले, सलाम रायगडचे संपादक राजेंद्र जाधव, परिषदेचे प्रतिनिधी शशिकांत मोरे उपस्थित होते.

प्रास्ताविकात राजेंद्र जाधव यांनी हा सन्मान सोहळा रोह्याच्या पत्रकारिता इतिहासात नोंद करावा असाच आहे. आदितीताईंनी आपल्या कामातून प्रत्येकाच्या मनात स्थान मिळविले. धाडसी व संयमी राजकारणी म्हणून उल्लेख करावा लागेल. मिलिंद अष्टीवकर यांची परिषदेच्या अध्यक्षपदाची निवड हा रोह्याचा बहुमान आहे तर मालक कसा असावा, सामाजिक भान काय असते ? याचे उत्तम उदाहरण ऋषितुल्य मुकुंदभाई आहेत अशा तीन घटकांचा उल्लेख करत करत हम साथ साथ है असेच काम करत राहू अशी भावना जाधव यांनी व्यक्त केली.



कार्यक्रमात ना. आदिती तटकरे यांच्या हस्ते उद्योग महर्षी पुरस्कार मुकुंदभाई तुराकीया, देवदूत पुरस्कार डॉ फरीद चिमावकर, डॉ महेंद्र म्हात्रे, डॉ अनिल यादव, डॉ भूषण खरिवले, युवा उद्योजक पुरस्कार रामचंद्र नाकती, आदर्श शिक्षण सेवा पुरस्कार गजनफर कलाब, रवींद्र लोखंडे, आदर्श कामगार पुरस्कार संजय वाढवळ, प्रगती कर्णेकर, स्वच्छ व सुरक्षित कंपनी पुरस्कार नेचुरेक्स प्रा लि धाटाव यांना रोहा प्रेस क्लब सन्मान २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन संदीप सरफळे, आभार प्रदर्शन रवींद्र कान्हेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष नाना खरीवले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेस क्लबच्या पदाधिकारी, सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यानंतर स्पंदन निर्मित स्वरसंध्या कार्यक्रमाने प्रेक्षकांची मने जिंकली.

# मैत्री महोत्सवात अध्यात्म आणि समाजसेवेचा संगम

**कर्जत : प्रतिनिधी**

आध्यात्मिक व सामाजिक संस्था मैत्रीबोध परिवारद्वारे आयोजित मैत्री महोत्सवाने अध्यात्मिक जागृती आणि सामाजिक उन्नतीचा अनोखा संदेश दिला. कर्जत येथे झालेल्या या महोत्सवात दहा हजारहून अधिक लोक उपस्थित राहिले तर लाखो लोकांनी तो टीव्ही प्रसारणाद्वारे पाहिला.



महोत्सवात मैत्रीबोध परिवाराचे अनेक अनोखे उपक्रम सादर करण्यात आले. मैत्री आदर्श ग्रामच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर भर देण्यात आला, तर पृथ्वी आलिंगन उपक्रमाने पर्यावरण संवर्धनाला चालना दिली. यासह चिंता-मुक्त भारत नावाचा एक नवीन उपक्रम सुरू करण्यात आला जो मानसिक आरोग्यासाठी नचिकेत नावाच्या आभासी चॅटबॉटसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून लोकांना दैनंदिन समस्या सोडविण्यात मदत करेल.या कार्यक्रमात आरोग्य सेवेतील लक्षणीय प्रगती पाहण्यात आली, ज्यामध्ये ८५०हून अधिक व्यक्तींच्या डोळ्यांची काळजी घेतली गेली आणि अनेकांची मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली. रायगड जिल्ह्यात प्रथमच १८ तासांत कृत्रिम अवयव तयार करून गरजूंना बसवण्यात आले ज्यामुळे अनेकांच्या जीवनात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या महोत्सवाची सुरुवात विश्वशांती महायज्ञाने झाली, यात सहा तास वैदिक मंत्रांचा उच्चार करून विश्वशांतीसाठी प्रार्थना करण्यात आली. संध्याकाळच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण अधिकच खास बनले. गायक आदित्य नारायण यांनी आपली कला सादर करत सर्वांची मने जिंकली.

तुमचे मन आम्हाला द्या, आम्ही त्यात परिवर्तन घडवून तुम्हाला परत करू असा संदेश मैत्रीबोध परिवाराचे संस्थापक आणि परिवर्तनाचे प्रणेते मैत्रेय दादाश्रीजी यांनी दिला. या महोत्सवात स्मिता जयकर, काजल अग्रवाल यांच्यासह अनेक दिग्गजांनी सहभाग घेतला होता.

# डॉ. बामणे यांना पुरस्कार

**पेण : प्रतिनिधी**

भाऊसाहेब नेने विद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख डॉ.देवीदास बामणे 'संघर्ष' यांना हिंदी भाषेचा प्रचार-प्रसार, साहित्य, शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरण, पत्रकारिता, अशा विविधांगी पवित्र आणि मंगल क्षेत्रात जो सेवेचा पिंड जोपासत आहात त्याची कृतज्ञता म्हणून पारस काव्य, कला, जनजागृती संस्था नवी मुंबई यांच्या वतीने शनिवारी (दि.२८) उपन्यास सम्राट प्रेमचंद पुरस्कार २०२४ प्रदान करण्यात आला.

प्रकल्पग्रस्तांच्या व्यथा तसेच रडते धरणीमाता या विषयांना अनसरून आयोजित केलेल्या राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेत सहभाग घेऊन प्रकल्पग्रस्तांचा ज्वलंत प्रश्नांचा वेध घेण्याचे काम प्रा. बामणे यांनी केले. त्याच्या जनजागृती कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी संस्थेचे अध्यक्ष मंगेश चांदीवडे, आगरी भाषेचे प्रसिद्ध कवि व साहित्यिक पुंडलीक म्हात्रे व नागपुरचे संत कबीराचे गाढा अभ्यासक कवि लेखक संजय बर्वे, लता देविदास बामणे, पुत्र सूरज देवीदास बामणे व सहकारी मित्रमंडळी उपस्थित होते.

या वेळी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अॅड.मंगेश नेने, कुंटुंब प्रमुख बापूसाहेब नेने, सचिव बाळासाहेब जोशी, उपकार्याध्यक्ष व खजिनदार संजय कडू, प्रशांत ओक, प्राचार्य डॉ.एस.बी.धारप व संस्थेचे इतर पदाधिकारी यांनी प्रा. डॉ.बामणे यांचे कौतुक केले.



# नवीन वर्षाचे काऊंटडाऊन

## मुरुड समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची धूम

**मुरुड : प्रतिनिधी**

सरत्या वर्षाला निरोप देत नवीन नववर्षाच्या स्वागतासाठी मुरुड पर्यटन क्षेत्रावर मोठ्या संख्येने पर्यटकांची गर्दी केली आहे. नवीन वर्षे सुरु होण्यासाठी अवघे तास शिल्लक राहिले आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण विविध ठिकाणी फिरायला जात असतात. याच पार्श्वभूमीवर मुरुडला पर्यटकांनी चांगली पसंती दिली आसुन पर्यटकांनी समुद्रकिनारे बहरले आहेत.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी समुद्रकिनारावरील हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट विद्युत रोषणाईने सजल्या आहेत. घोडागाडी, ऊंट स्वारी, बाईक स्वार, सायकलवर स्वारी करणे पर्यटकांनी पसंती केली आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची गर्दी वाढत आहे. गर्दीमुळे वाढल्याने वाहतुक व्यवस्था ही विस्कळीत होत आहे. मुरुड सह काशीद समुद्र किनारा पर्यटकांनी फुलून गेला असून शेकडो च्या संख्येने पर्यटक समुद्र किनारी फिरकले आहेत. प्रचंड मोठा जनसमुदाय समुद्र किनारी आल्याने जिकडे तिकडे गर्दीच गर्दी पहावयास मिळत आहे. मोठ्या गर्दी मुळे हॉटेल व लोजिंग व्यवसाय फार तेजीत आहेत.

काशीद येथे सर्वाधिक जास्त पर्यटक मोठ्या संख्येने आले असून रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची गर्दीच गर्दी दिसत आहे. मोठ्या संख्येने पर्यटक आल्याने सर्व लोकांना मोठा सव्यनरोजगर मोठ्या प्रमाणात मिळाला आहे.



# रातवड विद्यालयाचे स्नेहसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयात शुक्रवार २७ व शनिवार २८ डिसेंबर रोजी वार्षिक स्नेहसंमेलन व आनंद बाजार अत्यंत उत्साहात झाला.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध अभिनेते हसन शेख, प्रा. लक्ष्मण पाटील, छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संस्थेचे सदस्य मध्यामिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे शालेय समिती अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय पालकर, पर्यावरण गतिविधि प्रमुख श्रीनिवास वारखंडकर, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या १२व्या वंशज शितल मालुसरे, शालेय समिती निमंत्रित सदस्य सतीश पवार, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या निमित्ताने विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कलादालन रांगोळी प्रदर्शन, हस्तकला प्रदर्शन व चित्रकला प्रदर्शन दालनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक विषयांवर विद्यार्थ्यांनी सुंदर रांगोळ्या रेखाटल्या व चित्र रेखाटली होती.



विद्यालयातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या झेप हस्तलिखिताचे प्रकाशन प्रा.लक्ष्मण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या निमित्ताने अभिनेते हसन शेख, कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय पालकर, ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मण पाटील, शितल मालुसरे, श्रीनिवास वारखंडकर, सतीश पवार मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, विद्यार्थ्यांच्या कलागुणाचे, शिस्तीचे कौतुक केले.

२८ डिसेंबर रोजी सकाळी विद्यालयात आनंद बाजाराचे व विविध वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेत पारंपरिक तसेच आधुनिक विविध विषयांवरच्या वेशभूषांचे सादरीकरण केले. आनंद बाजारामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे खाऊचे स्टॉल्स मांडून विक्री केली.

या स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यालयात विविध क्षेत्रातील मान्यवर, पंचक्रोशीतील सामाजिक कार्यकर्ते, ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंच, सदस्य, शिक्षण विभागातील अधिकारी, ग्रामपंचायत रातवड सरपंच वैशाली जाधव, वडघर विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन पाटील, केंद्रप्रमुख सुधीर निकम व जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष कदम यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख शिक्षक अजित शेडगे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक प्रतिनिधी श्रीकृष्ण गरधे यांनी केले. सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात झाले.

# खरोशी केंद्राच्या स्पर्धा उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खरोशी केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा केंद्रप्रमुख प्रफुल्ल सुखचंद यांच्या नेतृत्वात प्रयोगशील शेतकरी प्रभाकर पाटील यांच्या वलक येथील शेतावर मोठ्या उत्साहात झाल्या.

या वेळी क्रीडा प्रकारांमध्ये मुलांसाठी लगोरी, बेचकीने नेम धरणे, तसेच मुलींसाठी लंगडी आणि दोरी उडी या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तर व्यक्तिमत्व विकास अंतर्गत पारंपारिक गीतावर नृत्य, समूहगीत गायन, पथनाट्य आणि मातीचे शिल्प तयार करणे या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापक समिती अध्यक्ष वलक नंदेश म्हात्रे, मा. उपसरपंच बळवली गणेश पाटील, नरेश ठाकूर, यांच्यासह अनेक मान्यवरांनी या स्पर्धेला भेट दिली. तर विद्यार्थी व पालक यांच्या दुपारच्या वनभोजनाची सोय प्रभाकर पाटील यांनी केली.

स्पर्धेत विविध खेळात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन सत्कार करण्यात आले.



# घरपट्टी व पाणीपट्टी ऑनलाईन भरणा करण्याचे आवाहन

**खोपोली : रामप्रहर वृत्त**

खोपोली नगर परिषद कार्यालयात, ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत IWBP वेबपोर्टलवर नागरीक आपली घरपट्टी व पाणीपट्टीची रक्कम ऑनलाईन भरणा करू शकता व पावतीदेखील ऑनलाईन नागरीकांना प्राप्त होईल. ऑनलाईन भरणा करण्याकरीता खालीलप्रमाणे वेबपोर्टलवर जाऊन भरणा करावा. https://mahaulb.in/MahaULB/index या वेबपोर्टला भेट द्या. (वेबसाईटवर भेट दिल्यावर पोपअप अलाऊ करुन घ्यावे अन्यथा पावतीची प्रिंट पोपअप होणार नाही) ऑनलाईन पेमेंट टॅबवर क्लिक करणे. मालमत्ता बिल भरणा/वॉटर बिल पेमेंट या टॅबवर क्लिक करणे. आपला मालमत्ता क्र. / नळ जोडणी क्र. प्रविष्ट करणे. (उदा. मालमत्ता क्र.- KHP000108815 / नळ जोडणी क्र.- KHP000000006326)

आपले तपशील तपासुन घ्यावे व भरावयाची देय रक्कम, कडून प्राप्त, ई-मेल आयडी व मोबाईल नंबर नमुद करावा, कॅप्चा टाकावा व पद्धत प्रकार - Easybuzz निवडावे. रक्कम भरावर क्लिक करून ऑनलाईन भरणा करावा, असे प्रशासन तथा मुख्याधिकारी खोपोली नगर परिषद यांनी पत्राद्वारे कळविले आहे.

# मेलबर्नच्या मैदानात ऑस्ट्रेलियाची सरशी

## चौथ्या कसोटीत भारताची हार

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

भारताला नमवत अखेरीस ऑस्ट्रेलियाने मेलबर्न क्रिकेट ग्राऊंडवर विजय नोंदवला आहे. ऑस्ट्रेलियाने मेलबर्न कसोटीत भारताचा १८४ धावांनी पराभव करत मोठा विजय नोंदवला आहे. या विजयासह ऑस्ट्रेलियाने बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये २-१ने आघाडी मिळवली आहे. एका क्षणाला भारतीय संघ हा कसोटी सामनाही ड्रॉ करेल अशी आशा होती, पण यशस्वी जैस्वाल वगळता भारताच्या अन्य फलंदाजांनी नांगी टाकली.

मेलबर्न कसोटीत ऑस्ट्रेलियाने भारतासमोर विजयासाठी ३४० धावांचे लक्ष्य ठेवले होते, ज्याचा पाठलाग करताना टीम इंडियाचा दुसरा डाव केवळ १५५ धावांवरच आटोपला. भारताच्या सात फलंदाजांनी तासाभरात एकापाठोपाठ आपल्या विकेट्स गमावल्या.

चौथ्या दिवशी ९ गडी गमावून ३३३ धावांची आघाडी घेणाऱ्या ऑस्ट्रेलियाने पाचव्या दिवशी आपल्या धावसंख्येत आणखी सहा धावांची भर घातली आणि भारताला ३४० धावांचे लक्ष्य दिले. मेलबर्नच्या मैदानावर भारताच्या युवा फलंदाजांनी कसोटी ड्रॉ करण्याचा प्रयत्न केला, मात्र ऑस्ट्रेलियाच्या भेदक गोलंदाजीपुढे फलंदाजांनी शरणागती पत्करली.



भारताने पहिल्या सत्राच्या अखेरपर्यंत ३३ धावांवर ३ मोठे विकेट गमावले. यानंतर ऋषभ पंत आणि यशस्वी जैस्वाल यांनी दुसरे सत्र एकही विकेट न गमावता ३ बाद ११२ धावा केल्या. इथून भारतीय संघ हा सामना अनिर्णित ठेवेल अशी आशा होती, पण तिसऱ्या सत्रात भारताने पहिल्या तासाभरातच झटपट सात विकेट्स गमावल्या.

ऑस्ट्रेलियाने मेलबर्नमधील विजयासह या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. आता पुढचा आणि अखेरचा सामना ३ जानेवारीपासून सिडनीमध्ये खेळवला जाणार आहे. भारताला जर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या शर्यतीत टिकून राहायचे असेल तर सिडनी कसोटी भारताला कोणत्याही स्थितीत जिंकावी लागेल.

### यशस्वीची विकेट वादग्रस्त

*यशस्वी जैस्वाल बाद नसतानाही त्याला बाद दिल्याची चर्चा चाहत्यांमध्ये रंगली आहे. जैस्वाल ८२ धावा करून खेळत होता आणि शॉर्ट चेंडूवर फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो बाद झाला, पण तिसऱ्या पंचांनी स्निकोमीटरवर हालचाल नसतानाही त्याला बाद घोषित केले होते. यानंतर आकाशदीपच्या झेलबाद बाबतही अशीच चर्चा आहे.*

# कॅम्पोलियन क्लब टी-२० क्रिकेट स्पर्धेत अलिबाग संघाला विजेतेपद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पोलियन क्लब थ्री स्टार हॉटेल अ‍ॅण्ड रिसॉर्ट खोपोली, आरडीसीए सदस्य समीर मसुरकर पुरस्कृत टी-२० जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाने विजेतेपद पटकाविले. त्यांनी अंतिम सामन्यात पेण स्पोर्ट्स असोसिएशन संघावर सहा गडी राखून दणदणीत विजय मिळवला.

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात अलिबाग संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारले होते. प्रथम फलंदाजी करताना पेण संघाने २० षटकांच्या समाप्तीनंतर पाच गडी गमावत १५३ धावसंख्या उभारली. सुरवातीचे फलंदाज झटपट बाद झाल्याच्या नंतर मधल्या फळीत रवी सोलंकी याने धुवांधार फलंदाजी करत ५७, तर दुसऱ्या बाजूने समीर आवस्करने ५३ धावा काढून संघाची धावसंख्या १५३पर्यंत पोहचवली, अलिबाग संघाकडून अभिषेक नाईक याने दोन, तर रितेश तिवारी, मिहिर भाटकर यांनी प्रत्येकी एक फलंदाज बाद केला.

१५४ धावसंख्येचा पाठलाग करताना अलिबाग संघाचे सलामीवीर अभिजित रोहांदिया ३९ व मिहिर भाटकर याने ३२ धावांचे योगदान दिले. मधल्या फळीत युवा तंत्रशुद्ध फलंदाज हृषिकेश राऊतने चौफेर टोलेबाजी करत नाबाद ४५ धावा ठोकल्या. त्याला चैतन्य पाटीलने दुसऱ्या बाजूने नाबाद १२ धावांची खेळी करत साथ दिली. अलिबाग संघाने सामना शेवटच्या षटकात सहा गडी राखून जिंकला. पेणकडून सिद्धार्थ म्हात्रे याने दोन व तुषार म्हात्रेने एक गडी बाद केला.

अंतिम सामन्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे उपाध्यक्ष राजेश पाटील, सदस्य अ‍ॅड. पंकज पंडित, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, रायगडचे माजी कर्णधार रवींद्र तांडेल, सिलेक्टर उदय गद्रे, माणुसकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजाराम हलवान, पंच चंद्रकांत म्हात्रे, सुयोग चौधरी, आदेश नाईक, सुनील सरगर यांच्यासह दोन्ही संघाचे खेळाडू व क्रिकेटप्रेमी नागरिक उपस्थित होते.

# ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक फलंदाज मालिकेतून बाहेर



**सिडनी : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर ट्रॉफी २०२४-२५चा चौथा कसोटी सामना रोमांचक वळणावर आहे. दरम्यान, या कसोटी सामन्यादरम्यान ऑस्ट्रेलियन संघासमोर एक संकट उभे ठाकले आहे. ऑस्ट्रेलियाचा यष्टिरक्षक फलंदाज जोश इंग्लिस बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या चौथ्या कसोटी आणि पुढील कसोटी सामन्यातून बाहेर पडला आहे.

जोश इंग्लिस हा मेलबर्न येथे सुरू असलेल्या बॉक्सिंग डे कसोटीत पर्यायी खेळाडू म्हणून मैदानात उतरला होता, मात्र त्याच्या पायाचा स्नायू ताणला गेला. त्यामुळे तो या मालिकेतून बाहेर पडला आहे.

सध्या संघात जोश इंग्लिस हा एकमेव अतिरिक्त फलंदाज होता, कारण अष्टपैलू ब्यू वेबस्टरला बिग बॅश लीगमध्ये खेळण्याची परवानगी देण्यात आली होती. आता ऑस्ट्रेलियाला सिडनी येथे होणाऱ्या पाचव्या कसोटीसाठी संघात अतिरिक्त फलंदाज समाविष्ट करण्याचा विचार करावा लागेल.

इंग्लिस बाहेर पडल्याने नॅथन मॅकस्विनीला संघात परत बोलावण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. या कसोटीपूर्वी सॅम कॉन्स्टासला मॅकस्विनीच्या जागी संघात संधी मिळाली होती, पण तो चमक दाखवू शकला नसल्याने संघाबाहेर गेला. आता त्याला पुन्हा संघात संधी मिळू शकते.

# क्रॉस कंट्री स्पर्धेत श्रावणी केणी प्रथम




**उरण : बातमीदार**

अलिबाग येथे झालेल्या जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धेत श्रावणी किरण केणी हिने प्रथम क्रमांक पटकावला. यासह तिची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

श्रावणी ही उरण तालुक्यातील नागाव ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांची मुलगी आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल श्रावणीचे अभिनंदन होत आहे. श्रावणीच्या यशात वाटा असलेल्या आई-वडिलांनाही अनेकांनी शुभेच्छा दिल्या.

# आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेसाठी रायगडचा संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**



महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या खुल्या गटातील आंतरजिल्हा निवड चाचणी टी-२० क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघ जाहीर करण्यात आला आहे.

पेण स्पोर्ट्स असोसिएशनचा अष्टपैलू खेळाडू सिद्धांत म्हात्रे याची कर्णधार व अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाचा तंत्रशुद्ध फलंदाज ऋषिकेश राऊत याची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे.

आरडीसीएतर्फे संघ निवडकर्ता म्हणून महाराष्ट्राचा माजी रणजीपटू पुष्कराज चव्हाण, योगेश पवार, उदय गद्रे, मैल्कम मोंटेरो यांनी काम पाहिले, तर मुख्य प्रशिक्षक म्हणून शंकर दळवी, प्रशिक्षक रवी सोलंकी, व्यवस्थापक म्हणून सागर मुळे काम पाहणार आहेत.

जाहीर झालेला रायगडचा संघ पहिल्या दोन सामन्यासाठी असणार असून ३१ डिसेंबरपासून एमसीएच्या स्पर्धेत सहभागी होईल. या संघाला पाच टी-२० क्रिकेट सामने खेळायचे आहेत. संघाला आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक यांच्यासह पदाधिकारी, सदस्य यांनी शुभेच्छा दिल्या.

रायगडचा संघ : सिद्धांत म्हात्रे कर्णधार, हृषिकेश राऊत उपकर्णधार, श्रेयस कुमार, ओम जाधव (यष्टीरक्षक) देवांश तांडेल, समीर आवास्कर, प्रतीत गोट सुर्वे (यष्टीरक्षक) चैतन्य पाटील, संतोष गोस्वामी, ओंकार महाडिक, मिहिर भाटकर, तेजस मोहिते, कौस्तुभ म्हात्रे, नसीब नाईक; राखीव खेळाडू अभिषेक खातू, साई साखरकर, तहा चिचकर, कौस्तुभ चौधरी. पश्चिम विभागासाठी प्रतिक म्हात्रे, रितेश तिवारी, संकेत गोवारी, अभिषेक जैन, अभिषेक नाईक.

# धनश्रीच्या पोस्टनंतर युजवेंद्रची इन्स्टा स्टोरी चर्चेत



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेटपटू युजवेंद्र चहल आणि त्याची पत्नी प्रसिद्ध यूट्युबर व कोरिओग्राफर धनश्री वर्मा यांच्या घटस्फोटाबाबत सध्या चर्चा सुरू आहेत. कोरोना काळात या दोघांचे प्रेम जुळले. त्यानंतर डिसेंबर २०२२मध्ये युजी-धनश्री यांनी लग्नगाठ बांधली होती.

धनश्री-युजी यांची जोडी सुरुवातीपासूनच चर्चेत असायची. धनश्री युजीसोबत कायम दिसायची, पण गेल्या दीड-दोन वर्षांपासून अचानक धनश्री आणि युजवेंद्र यांच्यात दुरावा आल्याचे दिसत आहे. पायाच्या दुखापतीमुळे धनश्री विश्रांती घेतेय असे काही वेळा सांगण्यात आले. यंदाच्या २२ डिसेंबरला या दोघांच्या लग्नाला ४ वर्षे पूर्ण झाली. तरीही सोशल मीडियावर नेहमी अ‍ॅक्टिव्ह असणाऱ्या या दोघांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवशी कुठलीच पोस्ट केली नाही. त्यामुळे या चर्चांना उधाण आले. तशातच धनश्रीने आपल्या इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ पोस्ट केली. त्यानंतर युजवेंद्रने इन्स्टाग्राम स्टोरी पोस्ट केली.

युजवेंद्र गेल्या काही काळापासून भारतीय संघाचा भाग नाही, पण तरीही धनश्रीसोबतच्या नात्यामुळे तो चर्चेत असतो. त्याच्या सोशल मीडियावर फॅन्स लक्ष ठेवून असतात. २२ डिसेंबरला लग्नाच्या वाढदिवशी दोघांनीही एकही पोस्ट किंवा स्टोरी टाकली नव्हती, पण धनश्रीने आपल्या इन्स्टाग्रामवर शुक्रवारी एक व्हिडीओ पोस्ट केली. त्यात ती एका गायकासोबत गाताना दिसत आहे.

या व्हिडीओवर युजवेंद्रने कमेंट केलेली नाही, पण त्याने शनिवारी एक इन्स्टाग्राम स्टोरी पोस्ट केली आहे. त्यात त्याने बजरंगबलीचा फोटो पोस्ट केला आहे. त्याखालील वाक्य खूपच बोलकं आहे. त्या फोटोखाली लिहिलं, काहींना भीती असते की देव सगळं काही पाहतोय, पण काहींना दिलासा आणि विश्वास असतो की देव सगळं पाहतोय.

# महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कुस्ती संघाची निवड

**अलिबाग, रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा कुस्ती संघ निवडण्यात आला आहे. अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे रविवारी रायगड जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यातून रायगडचा संघ निवडण्यात आला.

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघ, जय हनुमान तालीम संघ व ग्रामस्थ मंडळ वाडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने खासदार सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्रात ही स्पर्धा रंगली. सब ज्युनियर मुले, सब ज्युनियर मुली, खुला गट पुरुष गादी व माती, महिला खुला गट, पुरुष खुला गट ग्रिकोरोमन, बालगट मुले व मुली अशा गटांमध्ये ही स्पर्धा खेळविण्यात आली. या गटांमधील विजेत्यांची महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याच्या संघात निवड करण्यात आली, अशी महिती रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष जयंद्र भगत यांनी दिली.

या निवड चाचणी कुस्ती स्पर्धेसाठी श्रीराम पाटील, विष्णू पाटील, राजाराम कुंभार, वैभव मुकादम, सुनील नांदे, प्रसन्न पाटील, सावळाराम पायमोडे, रवींद्र घासे, सुधाकर पाटील, प्रवीण भोपी, जितेंद्र गावंड, भालचंद्र भोपी, योगेश गायकर, नाना राणे, श्रीराम दोंदल सर, यतीराज पाटील, रोशनी परदेशी यांनी पंच म्हणून काम पाहिले.



स्पर्धा यशस्वी करण्यासाठी जय हनुमान तालीम संघाचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकूर, उपाध्यक्ष गोपीनाथ ठाकूर, गणपत पवार, नथुराम म्हात्रे, नरेश कडू, नरेश थळे, रमेश भगत, रवींद्र ठाकूर, सुनील थळे, प्रवीण भगत, मिलिंद भगत, प्रकाश भगत, नितीन पाटील, संकेत लाखन, हेमंत लाखन तसेच मंडळाचे अन्य सदस्य व सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

**महाराष्ट्र केसरी स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू**

सब ज्युनियर गट मुले : ४५ किलो विश्वजीत संभाजी गोदे, ४८ किलो अभिषेक सुखदेव साह, ५१ किलो सिद्धार्थ किरण भोपी, ५५ किलो संचित संतोष गायकवाड, ६० किलो वेदांत एकनाथ पाटील, ६५ किलो निखिल विश्वनाथ भोपी, ७१ किलो विकास सुशील यादव, ८० किलो संस्कार किसन शिंदे, ९२ किलो कृपेन श्रीधर पावशे, ११० किलो पियुष विकास भगत; पुरुष खुला गट गादी विभाग (फ्रीस्टाइल) : ५७ किलो विजय बळीराम धुळे, ६१ किलो संकेत रघुनाथ कुंभार, ६५ किलो सुरज माधव जोशी, ७० किलो रोशन दत्तू धुळे ७४ किलो प्रतीक गजानन हातमोडे, ७९ किलो दिवेश दत्तात्रय पालांडे, ८६ किलो शुभम देवेंद्र म्हात्रे, ९२ किलो श्रेयस सुनील करे, ९७ किलो कुलदीप केशव पाटील, १२५ किलो केसरी गट कुणाल तुळशीराम धुळे; पुरुष खुला गट माती विभाग (फ्रीस्टाइल) : ५७ किलो निकेश रामचंद्र धुळे, ६१ किलो रोशन उत्तम धुळे, ६५ किलो साजन चाहू पावशे, ७० किलो किरण नामदेव ढवळे, ७४ किलो प्रवीण हिरो धुळे, ७९ किलो जयेश अरुण खरमारे, ८६ किलो यश कृष्णा कडवे, ९२ किलो शुभम दत्तात्रय वरखडे, ९७ किलो अंश अमर धोंडसेकर, १२५ किलो केसरी गट निमिश नितीन घरत; पुरुष खुला गट (ग्रीको रोमन कुस्ती) : ५५ किलो चिराग अनंत गायकवाड, ६० किलो राज सुभाष पाटील, ६३ किलो सुरज सीताराम झा, ६७ किलो शिव सुंदर रमेश साहू, ७२ किलो श्रेयस संतोष बोले, ७७ किलो विशाल सीताराम पुजारी, ८२ किलो प्रशांत परशुराम पाटील, ८७ किलो विनायक पाल, ९७ किलो मयूर महादेव कोकरे, १३० किलो सोहम धनेश म्हात्रे; सब ज्युनियर मुली : ४० किलो नेहा श्याम राठोड, ४३ किलो ऋतुजा राजेंद्र मरागजे, ४६ किलो राजनंदिनी अंकुश जुंधळे, ४९ किलो साची कमलेश मोहिते, ५३ किलो प्रणाली ईश्वर घनवट, ५७ किलो लावण्या दिलीप देशमुख, ६१ किलो वेदिका संजय थोरात, ७३ किलो श्रावणी देवानंद चेरकर; महिला खुला गट : ५० किलो पायल संतोष मरागजे, ५३ किलो वैष्णवी मनोहर कुंभार, ५५ किलो सुरभी अजित पाटील, ५७ किलो प्राप्ती प्रतीक पाटील, ५९ किलो वैष्णवी गोपाळ वैद, ६२ किलो प्रांजली राजाराम कुंभार, ६५ किलो अमेघा अरुण घरत, ६८ किलो रितिका मच्छिंद्र कराडे, ७२ किलो भाग्यश्री अनंत पाटील, ७६ किलो केसरी गट सुरक्षा प्रदीप थळे.











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com